# बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)




दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक ३१ | बुधवार,दि.०६ जुलै २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करण्याचा निश्चय–मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई :** शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करण्याचा निश्चय राज्य सरकारने केला असून राज्यातील जनतेला दिलासा देण्यासाठी पेट्रोल डिझेल वरील व्हॅट कमी करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. विधानसभेत विश्वासदर्शक ठरावानंतर अभिनंदनाच्या प्रस्ताव–ावर भाषणाच्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.



**हिरकणी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी २१ कोटी**

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या हिरकणी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी २१ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. या निधीतून हिरकणी गावाचा सर्वांगीण विकास साधला जाईल. केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वी इंधनावरील कपात केली त्याच धतीवर राज्यातील जनतेला दिलासा देण्यासाठी इंधनावरील व्हॅट कमी करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे.

आगामी कालावधीत सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी निर्णय घेण्यात येतील. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून साकारत असलेल्या समृद्धी महामार्गातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन राज्याच्या विकासाला चालना मिळेल. मुंबईतील मेट्रो प्रकल्पाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला जाईल.

मेट्रो प्रकल्प गतीने पूर्ण करण्याकडे राज्य शासनाचे प्राधान्य असेल. राज्यातील सर्व प्रलंबित प्रकल्पांच्या कामांना गती देणार आहेत. तसेच शासनाच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारे एकांगी निर्णय न घेता सर्वांच्या हितासाठी शासन प्रयत्न करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी दिली.

राज्य शासन सर्वांना बरोबर घेऊन सर्वधर्मीयांना समन्यायाने वागणूक देणार असून सर्वांच्या विकासासाठी हे शासन काम करेल. राज्यातील सर्व प्रलंबित प्रकल्पांची कामे मार्गी लावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांचा सच्चा सैनिक म्हणून मी काम करणार आहे. जनसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी तात्काळ निर्णय घेऊन सर्वसामान्यांची कामे लवकर होण्यासाठी आमचे सरकार भर देणार असून महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी अहोरात्र प्रयत्न करणार आहोत.

## शिंदे-फडणवीस सरकारने बहुमत प्रस्ताव जिंकला

**मुंबई :** राज्यात सुरु असलेला सत्तासंघर्षात शिवसेनेविरुद्ध बंड पुकारून मुख्यमंत्रीपदावर विराजमान झालेले एकनाथ शिंदे यांच्या सरकारने आज विधासभेत बहुमत प्रस्ताव जिंकला. विश्वासदर्शक ठरावाच्या बाजूने १६४ मते मिळाली. तर महाविकास आघाडीला अवघी ९९ मते मिळाली.


महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी एकनाथ शिंदे सरकारकडून विश्वासदर्शक ठराव मांडण्यात आला. सुधीर मुनगंटीवार यांनी विश्वासदर्शक ठराव मांडला आणि त्याला भरत गोगावले यांनी अनुमोदन दिले. सुरुवातीला आवाजी मतदान झाल्यानंतर प्रत्यक्ष मतमोजणी करण्यात आली. यावेळी भाजपा–शिंदे सरकारने १६४ मतांसहित बहुमताचा आकडा पार केला आणि विश्वासदर्शक ठराव जिंकला.

अशोक चव्हाण, विजय वडेट्टीवार, झिशान सिद्दीकी, धीरज देशमुख अनुपस्थित राहिले. उशिरा आल्याने त्यांना सभागृहात प्रवेश मिळाला नाही. तर प्रणिती शिंदे, जितेश अंतापुरकर कालही अनुपस्थित होते आणि आजही अनुपस्थित राहिले. जितेश अंतापूरकर यांचे लग्न असल्याने अनुपस्थित होते तर प्रणिती शिंदे या परदेशी आहेत.

# जिल्हा नियोजन समिती बरखास्त,निमंत्रित सदस्य वर्षातच पायउतार

**गोंदिया–** राज्यातील नवविराजमान एकनाथ शिंदे सरकारने जिल्हा नियोजन समिती बरखास्त करण्याचे फर्मान काढले आहे. त्यामुळे मागील उद्धव ठाकरे सरकारने नेमलेले निमंत्रित सदस्य वर्षातच पायउतार झाले आहेत.

जिल्ह्यातील जिल्हा परिषद व नगरपंचायतीच्या निवडणुका झाल्याने त्यांच्या जागेवर नवीन सदस्य येतील तर नगरपालिकेवर प्रशासक नेमले आहे. महाविकास आघाडीने सरकारने विशेष निमंत्रित म्हणून जिल्हा नियोजन समितीत सदस्यांना संधी दिली होती.



यामध्ये शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादीच्या नेत्यांना संधी दिली होती. या सर्वांना पायउतार व्हावे लागले आहे.

नव्या सरकारने सोमवारी काढलेल्या आदेशात समितीने दिलेल्या कामांना पुढील पालकमंत्री नियुक्त होईपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे. शिवाय नवीन पालकमंत्री नवीन विशेष निमंत्रित सदस्यांची नियुक्ती करणार आहेत. यामुळे आता नियोजन समितीवर जे सदस्य आहेत, त्यांची नियुक्ती रद्द ठरविण्यात आली आहे.समितीच्या १ एप्रिल २०२२ पासून विविध योजनांतर्गत मान्यता देण्यात आलेल्या विविध प्रशासकीय कामांना स्थगिती देण्यात आली आहे. नवीन पालकमंत्री नियुक्त झाल्यानंतर मान्यता प्राप्त कामांची यादी पाहून कामे पुढे ठेवायची की नाही? याचा निर्णय घेतील, असे आदेशात नमूद केले आहे.

## आषाढीच्या महापुजेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना मंदिर समितीकडून निमंत्रण

**मुंबई :** शिंदे गटाने बंड पुकारल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. उद्धव ठाकरे यांनी राजीनामा देताच राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळलं. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. विशेष बाब म्हणजे या नवीन सरकारने विधासभेत बहुमतही सिद्ध केलं.दरम्यान, एकनाथ शिंदे यांना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी विठ्ठलाच्या पूजेचं निमंत्रण दिलं.

आषाढी एकदशीनिमित्त पंढरपूरच्या विठ्ठलाची पूजा करण्याचा मान मुख्यमंत्र्यांचा असतो. गेली दोन वर्षे कोरोनामुळे पायी आषाढी वारी होऊ शकली नाही. त्यामुळे लाखो वारकरी पंढरपूरला जाऊ शकले नव्हते.

कोरोना संकटात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे यांना वारकऱ्यांशिवाय ही महापूजा करावी लागली होती. मात्र यंदा कोरोनाचे संकट सावरल्यानंतर आषाढी वारीला परवानगी देण्यात आली. त्यामुळे पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आषाढी एकादशीच्या श्री विठ्ठलाच्या महापूजेचे निमंत्रण देण्यात आले. मंदिर समितीच्या सदस्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांची निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

तसेच त्यांचा वारकरी फेटा, उपरणे, वीणा आणि पांडुरंगाची तसबीर देऊन सत्कार केला. याप्रसंगी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह–अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, पंढरपूर प्रांत अधिकारी आणि मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी गजानन गुरव तसेच मंदिर समिती सदस्य आदी उपस्थित होते.

## दोन चिमुकल्या बहिणींचा संशयास्पद मृत्यू

**नागपूर :** पाटणसावंगी येथील बाजार चौक परिसरात दोन चिमुकल्या मुलींचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी घडली. साक्षी फुलसिंग मीना (वय ६) व राधिका फुलसिंग मीना (वय ३) असे मृतक मुलींचे नाव आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार दोन महिन्यापासून मुलींची आई माधुरी फुलसिंग मीना ही पूनम, साक्षी व राधिका या तीन मुलीसह येथील बाजार चौक परिसरात राहणाऱ्या आई गंगाबाई भैयाजी काळे यांच्या घरी राहत होती.

आज सकाळी साक्षी व राधिका यांची तब्येत ठीक नसल्याचे सांगितले. यानंतर आई व आजीने दोघींना प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. दोघींना तपासले असता राधिकाचा आधीच मृत्यू झाला होता. तर साक्षी ही अतीगंभीर दिसल्याने तिला नागपुरातील मेयो हॉस्पिटलसाठी रवाना केले पण तिचाही रस्त्यात मृत्यू झाला.

# ओबीसी खात्याचे विद्यार्थ्यांबाबत उदासीन धोरण; स्पर्धा परीक्षांच्या प्रशिक्षणात मागे

**नागपूर :** स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण दिल्याशिवाय मागासवर्गीय विद्यार्थी स्पर्धेत टिकू शकणार नाही. मात्र, इतर मागासवर्गीय (ओबीसी) खाते त्याबाबत उदासीन असल्याचे दिसून येते. निव्वळ पदवी किंवा तत्सम शिक्षण घेऊन उपयोग नाही. स्पर्धा परीक्षेची तयारी ही काळाची गरज आहे. ही तयारी करण्यासाठी मागासवर्गीय युवकांसाठी काहीच व्यवस्था नाही. त्यादृष्टीने ओबीसी खात्याने पावले उचलणे अपेक्षित होते. परंतु त्यासंदर्भात हे खाते कायमच उदासीन राहिले आहे. त्याउलट सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने तत्परता दाखवून अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना दिलासा दिला.



डॉ. बाबासाहेब आंबडेकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत बँक (आयबीपीएस), रेल्वे, एलआयसी व तत्सम स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण, पोलीस व लष्कर भरतीचे प्रशिक्षण जिल्हास्तरावर देण्याचे त्यांचे नियोजन आहे. दुसरीकडे ओबीसी खाते याबाबत ढिम्म आहे. "महाज्योती'ने नीट आणि जेईईचे प्रशिक्षण ऑनलाइन देऊन बट्ट्याबोळ केला. तसेच एमपीएससी आणि यूपीएससीचेदेखील प्रशिक्षण देणाऱ्या संस्था निवडण्यात, वेळेत अनेक उणिवा आहेत. परंतु ओबीसी खाते याबाबत अजिबात गंभीर नसल्याचे दिसून येते.

शासकीय नोकरीत लोकसंख्येच्या तुलनेत ओबीसींचा टक्का कमी आहे. तरीही बार्टीच्या धतीवर प्रशिक्षण देण्याची कोणतीच योजना ओबीसी खाते किंवा "महाज्योती'कडे असू नये, याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

बार्टीने राज्यात ३० प्रशिक्षण केंद्रांवर बँक, रेल्वे, एलआयसी व तत्सम स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण तसेच पोलीस व लष्कर भरतीचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या जिल्ह्यात प्रशिक्षण केंद्र उपलब्ध नाहीत त्यासाठी निविदा काढून नवीन केंद्र सुरू करण्याचा आणि ज्या जिल्ह्यात एकापेक्षा अधिक केंद्राची आवश्यकता असल्यास तेथे ते सुरू करण्याचा निर्णयदेखील बार्टीने घेतला आहे.

# खजरी–खोडशिवनी–कोसमतोंडी मार्गावरील पूल गेला वाहून



**गोंदिया:** मृग नक्षत्रात बऱ्यापैकी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. मात्र संपूर्ण मृग कोरडा गेला. आद्र नक्षत्राच्या सुरुवातीपासून अधून मधून पावसाची हजेरी सुरू होती. रविवार संध्याकाळपासून जिल्ह्यातील विविध भागात पावसाला दमदार सुरुवात झाली. सोमवारी सकाळपासूनच जिल्ह्यात संतधार पावसाने हजेरी लावली असून मंगळवारला जिल्ह्यात ८१.२मिमी पावसाची नोंद झाली आहे.

गोंदिया तालुक्याती



८१.४,तिरोडा तालुक्यात १४०,गोरेगाव १०६.७,सडक अर्जुनी १५०.७ मि.मी पावसाची नोंद झाली असून या तालुक्यात अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. मंगळवारला सकाळपासून जरी पावसाने उघाड दिले असले तरी हवामान विभागानुसार जिल्ह्यात पुन्हा पावसाची हजेरी वर्तविण्यात आली आहे.या पावसामुळे खरीप पिकांना नवसंजीवनी मिळाली असून बळीराजाही सुखावला आहे.

गोंदिया जिल्ह्यात सोमवार आणि मंगळवारला झालेल्या जोरदार पावसामुळे अतिवृष्टीची नोंद करण्यात आली आहे.तर दुसरीकडे या पावसाने नदीनाल्यांना पुल आल्याने काही लहानमार्ग बंद होऊन संपर्क सुध्दा तुटला आहे.सोबतच सडक अर्जुनी तालुक्यातील खजरी ते



खोडशिवनी–कोसमतोंडी मार्गावरील नाल्यावर तयार करण्यात आलेलाय पर्यायी पूल या अतिवृष्टीत वाहून गेल्याने खजरी–खोडशिवनीचा सडक संपर्क तुटला गेला आहे.

सविस्तर असे की खजरी खोडशिवनी मार्गावरील नाल्यावर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मोठ्या पुलाचे बांधकाम सुरु असून या बांधकामामुळे नागरिकांसाठी शेजारीच पर्यायी मार्ग तयार करण्यात आलेला होता.मात्र सोमवारला आलेल्या जोरदार पावसाने तो पूर्णतः वाहून गेल्यामुळे या महत्वपूर्ण रस्त्यावरील वाहतूक बंद झाली आहे.

खोडशिवनी येथील शेतकरीबांधवाची शेती ही म्हसवानी व घोटी परिसरात असल्याने आणि पुल वाहून गेल्याने रोवणीच्या कामासाठी जाणार्या शेतकऱ्यासमोर अडचण निर्माण झाली आहे.सोबतच खजरी येथील कनिष्ठमहाविद्यालयात जाणारे विद्यार्थी यांच्या अभ्यासक्रमाचे नुकसान होत आहे.

सदर मार्ग महत्वाचा असून तालुक्याला व जिल्हा ठिकाणी जाणारा असल्याने याठिकाणी तातडीने पर्यायी पुलाची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या कार्यकारी अभियंता यांच्याकडे केली आहे.

गोंदिया जिल्ह्यात जून महिन्यात अपेक्षेपेक्षा पावसाची सरासरी अत्यल्प होती. अनेक भागामध्ये पावसाने दांडी मारली होती. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. रविवारी संध्याकाळपासून सुरू झालेला पाऊस अगदी शेतकऱ्यांच्या अपेक्षेप्रमाणे आहे. कधी संततधार, कधी रिमझिम तर कधी मुसळधार पाऊस बरसतो आहे. या पावसामुळे धान रोवणीच्या कामाला गती मिळणार असल्याचे शेतकरी सांगताहेत.

गोंदिया जिल्हा धानाचा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यामध्ये १ लाख ९० हजार हेक्टरवर धानाची लागवड होते. उर्वरित क्षेत्रामध्ये शेतकरी तुर, तीळ, मका, ऊस, हळद, आले, भाजीपाला आदी पीक घेतात. शहरातील मुख्य बाजारपेठेसह अनेक वॉर्डीमध्ये रस्त्यावर पाणी साचल्याने शहरवासीयांची चांगलीच दाणादाण उडाली होती.

पावसाच्या तुरळक सरी कोसळल्या त्यानंतर दिवसभर ऊन सावलीचा खेळ सुरू होता. वादळ, मेघगर्जना, विजांच्या कडकडाटसह शहरासह जिल्ह्यातील अनेक भागात या पावसाने झोडपून काढले.

बाजारपेठेतील नाल्या केरकचरा व प्लास्टिकने तुंबल्याने रस्त्यावर अर्धा–एक फूट पाणी साचून होते. ते पाण्यातूनतू वाट काढताना वाटसरु व वाहनचालकांना मोठी



कसरत करावी लागल्याने काही ठिकाणी वाहतुकीची कोंडीही झाली होती. गोंदिया नगर परिषदेने काही दिवसांपूर्वी शहरातील नालेसफाईची कामे केल्याचा दावा केला होता. त्यामुळे यंदा पावसात गोंदियाकरांची दाणादाण उडणार नसल्याचे वाटत असतानाच पहिल्याच पावसात नागरिकांना ठिकठिकाणी नाले तुंबून साचलेल्या पाण्यातून वाट काढावी लागली.

शहरातील मोठ्या नाल्यांची साफसफाई ही जेसीबी सहाय्याने केली जात होती तर छोट्या नाल्यांची साफसफाई ही कामगारांकडून केली जाते.तसेच विहीत मुदतीत चांगले काम करण्यास नगरपरिषद प्रशासन कटीबद्ध असल्याचा दावाही गोंदिया नगरपरिषदेने केला होता. परंतु हा दावा फोल ठरला असल्याचे गोंदियाकरांनी अनुभवले.

# शिंदे-फडणवीस सरकार मंत्रिमंडळाचा विस्तार 'या' दिवशी होणार?

**मुंबई–**राज्यात सत्तांतर झाल्यानंतर सगळ्यांचे लक्ष नव्या सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारावर लागले आहे. या नव्या सरकारच्या मंत्र्यांचा शपथविधी कार्यक्रम १२ किंवा १३ जुलै रोजी होण्याची शक्यता आहे. त्यानंतर काही दिवसानंतर विधीमंडळाचे अधिवेशन होणार आहे. त्यामुळे या अधिवेशनाच्या आधीच नवीन मंत्री आपला पदभार स्वीकारण्याची शक्यता आहे. येत्या दोन दिवसात खाते वाटपावर चर्चा होणार असल्याची शक्यता आहे. १८ जुलैपासून पावसाळी अधिवेशनाला सुरवात होत असल्याने त्यापुर्वीच मंत्रीमंडळाचे खातेवाटप करण्याचा विचार शिंदे फडणवीस यांच्यात झालेला आहे.

शिवसेनेत आतापर्यंतची सर्वात मोठी बंडाळी झाली आहे. शिवसेनेचे निष्ठावंत समजले जाणारे एकनाथ शिंदे यांनी पक्षाविरोधात बंड पुकारले. एकनाथ शिंदे यांनी पक्षात उभी फूट पाडत ४० आमदार आपल्या बाजूला वळवले आहेत. त्यानंतर या गटाने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात असलेले महाविकास आघाडी सरकार पाडले आणि भाजपसोबत सरकार स्थापन केले आहे.

एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाले असून देवेंद्र फडणवीस हे नाट्यमयरीत्या उपमुख्यमंत्री झाले आहेत. त्यानंतर आता नव्या सरकारच्या शपथविधीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

एकनाथ शिंदे गट आणि भाजपमध्ये येत्या दोन दिवसात खाते वाटपावर चर्चा होणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काही महत्त्वाची खाती शिंदे गटाला मिळणार आहे. भाजपकडे गृह, महसूल खाते जाण्याची शक्यता आहे. तर, शिंदे गटाकडे नगरविकास, सार्वजनिक बांधकाम खाते जाणार असल्याची चर्चा सुरूआहे

वर्ष २०१४ ते २०१९ दरम्यानच्या काळात भाजप–शिवसेना युतीच्या काळात गृह, महसूल, नगरविकास आणि सार्वजनिक बांधकाम खाते भाजपकडे होती. महाविकास आघाडी सरकारच्या काळात गृह खाते हे राष्ट्रवादी काँग्रेसकडे, महसूल खाते काँग्रेसकडे, नगरविकास खाते शिवसेनेकडे होते.दरम्यान, याआधी समोर आलेल्या माहितीनुसार, भाजप आणि एकनाथ शिंदे गटातील चर्चेनुसार, दर ६ आमदारांमागे एक कॅबिनेट आणि राज्यमंत्रीपद दिले जाऊ शकते. सहा आमदारांमागे एक मंत्री या सूत्रानुसार भाजपला फायदा होणार आहे. भाजपला या सूत्रानुसार २८ मंत्रिपदे मिळणार आहेत.

# राज्यात खासगी शाळांचे १.२५ लाख,अनुदानितचे ३.२३ लाख विद्यार्थी,तर १७ हजार शिक्षक घटले

**गोंदिया–** कोरोनामुळे नोकऱ्या गेल्या, व्यवसाय ठप्प झाले.मुलांच्या शिक्षणाचा खर्च पेलवणे अशक्य होऊन बसले.यामुळेच देशातील लक्षावधी पालकांनी ३०.५२ लाख मुलांना खासगी शाळेतून काढून सरकारी शाळेत टाकले. परिणामी सरकारी शाळांत ३९.७२ लाख विद्यार्थी वाढले. दुसरीकडे, महाराष्ट्रात सरकारी,अनुदानित आणि खासगी अशा सर्वच शाळांतील सुमारे ५.४२ लाख विद्यार्थी घटले आहेत.ते शाळाबाह्य झाल्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे.धक्कादायक म्हणजे या २ वर्षांत राज्यात १७ हजार शिक्षकांच्या नोकरीवर गदा आली.

युनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन प्लस म्हणजेच यूडायस प्लसने २०२०–२१ चा वार्षिक अहवाल नुकताच सादर केला.त्यानुसार, भारतात १५.०९ लाख शाळा, ९६.८६ लाख शिक्षक तर २६.४४ कोटी प्री–प्रायमरी ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी आहेत.महाराष्ट्रात १.१० लाख शाळा,७.६६ लाख शिक्षक,तर २.२५ कोटी विद्यार्थी आहेत.

| भारत : सरकारी शाळांतले विद्यार्थी ४० लाखांनी वाढले | | | | |
|---|---|---|---|---|
| शाळा | 2019-20 | 2020-21 | फरक | टक्के |
| सरकारी | 13.09 कोटी | 13.49 कोटी | 39.72 लाख | 3.03% |
| अनुदानित | 2.74 कोटी | 2.68 कोटी | -6.53 लाख | -2.37% |
| खासगी | 9.82 कोटी | 9.51 कोटी | -30.52 लाख | -3.1% |
| इतर | 78.88 लाख | 75.43 लाख | -3.45 लाख | -4.3% |
| एकूण | 26.45 कोटी | 26.44 कोटी | -77588 | -0.02% |

| महाराष्ट्र : सर्वच शाळांतील ५.४२ लाख विद्यार्थी घटले | | | | |
|---|---|---|---|---|
| शाळा | 2019-20 | 2020-21 | फरक | टक्के |
| सरकारी | 56.46 लाख | 55.94 लाख | -51593 | -0.9% |
| अनुदानित | 1.5 कोटी | 1.2 कोटी | -3.42 लाख | -3.23% |
| खासगी | 66.63 लाख | 65.37 लाख | -1.25 लाख | -1.9% |
| इतर | 1.55 लाख | 1.32 लाख | -23041 | -14.7% |
| एकूण | 2.30 कोटी | 2.25 कोटी | -5.42 लाख | -2.35% |

**विद्यार्थी:देशात वाढले, महाराष्ट्रामध्ये घटले**

२०१९–२० देशात सरकारी, अनुदानित, खासगी व अन्य शाळांमध्ये २६.४५ कोटी विद्यार्थी शिकत होते. २०२०–२१ मध्ये यात ०.०२ टक्क्यांची घट झाली. दुसरीकडे, सरकारी शाळांमध्ये ३९.७२ लाख विद्यार्थी वाढले.

महाराष्ट्रात मात्र सर्व शाळा मिळून ५.४२ लाख म्हणजे २.३५ टक्के विद्यार्थी घटले.

**पहिलीच्या वर्गात मुली घटल्या**

पहिलीच्या वर्गात प्रवेश घेणाऱ्यांची संख्या २०२०–२१ मध्ये ८.७% घटून १ कोटी ९३ लाखांवर आली. ८.५% मुले, तर ८.९% मुली घटल्या. महाराष्ट्रात कोरोनाच्या काळात पहिल्या वर्गातील प्रवेशात ७.७% घट झाली आहे.

देशात शासकीय शाळांची संख्या घटली, खासगी शाळांची वाढली

२०१९–२० मध्ये देशात १,५७,७०८ शाळा होत्या. २०२०–२१ मध्ये आकडा १,५०,९१३६ वर गेला. ५२१ सरकारी शाळा बंद झाल्या. ३२५४ खासगी व १२३८ अन्य शाळा सुरू

महाराष्ट्रात शाळांची संख्या १ लाख १०,२२९ वरून १ लाख १०,११४ वर आली. शासकीय १५,२२२ खासगी, तर अन्य ७४ शाळा बंद पडल्या.

**६.५ हजार सरकारी शिक्षक घटले**

२०१९–२० मध्ये देशात ९६ लाख ८७,५७७ शिक्षक होते. २०२०–२१ मध्ये त्यात ८,८४८ ची वाढ होऊन ही संख्या ९६ लाख ९६,४२५ झाली. देशात या २ वर्षांत शासकीय शाळांतले ११,७६९, अनुदानितचे ११,९४६ तर अन्य शाळांतील १२,४८६ शिक्षक कमी झाले. खासगी शाळांत मात्र ४ लाख ५०,०४९ शिक्षक वाढले.महाराष्ट्रात एकूण ७ लाख ८३,८४७ शिक्षकांत १६,९३१ ची घट होऊन आकडा ७ लाख ६६,९१६ वर आला. शासकीय शाळेतले ६६६०, अनुदानितचे ५५६७, खासगीचे ४०७० तर अन्य शाळांतले ६३४ शिक्षक घटले.

## संपादकीय

### राष्ट्रपतीपदी पुन्हा एकदा शिक्षक विराजमान होणार !

देशाला अनेक राष्ट्रपती लाभले जे त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात अव्वल होते, त्यापैकी देशाला लाभलेले एक राष्ट्रपती म्हणजे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन. डॉ. ते एक सामान्य शिक्षकच होते. एक सामान्य शिक्षक राष्ट्रपती पदापयंर्त पोहोचू शकतो, हे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी दाखवून दिले होते. परत एकदा त्याचीच पुनरावृत्ती होत आहे. भारताच्या राष्ट्रपतीपदी पुन्हा एकदा शिक्षक विराजमान होत आहे. भाजप व सहयोगी पक्षांनी एक सामान्य व एक नवीन चेहरा राष्ट्रपती पदासाठी समोर आणलेला आहे. ते अज्ञात नाव असलेले द्रौपदी मुर्मू या आदिवासी महिला होय. द्रौपदी मुर्मू या एका सामान्य गरीब कुटुंबातील असून त्यांनी आपल्या जीवनात अनेक चढउतार बघितले आहे. एक आदिवासी महिला, ज्यांच्याबद्दल फारच कमी लोकांना माहिती आहे. त्यांचा आजवरचा प्रवास इतका प्रेरणादायी आहे की तो प्रत्येक भारतीयाला आणि खासकरून महिलेला ठावूक असला पाहिजे.

ओडीसा राज्यातील मयूरभंग जिल्ह्यामध्ये उपरबेडा हे आदिवासी गाव आहे, या गावातील छोट्याश्या आदिवासी कुटुंबातून द्रौपदी मुर्मू यांचा प्रवास सुरू झाला. १९९७ मध्ये त्यांनी राजकारणामध्ये पाऊल ठेवले आणि तेव्हापासून आजपर्यंत त्यांनी जी घौडदौड सुरू ठेवली आहे ती नक्कीच वाखाणण्याजोगी आहे. राजकारणात येण्यापूर्वी त्या शिक्षकी पेशात कार्यरत होत्या.

१९९७ साली राजकारणात उतरल्यावर त्याच वर्षी त्यांच्यातील राजकीय गुण पाहून भारतीय जनता पक्षाने त्यांना ओडीसा आदिवासी मोचार्चे उपाध्यक्ष केले. ओडीसा मधील पटनायक सरकारच्या कार्यकाळात (२०००-२००४) त्यांनी मंत्री म्हणूनही काम पाहिले होते. पुढील दोन वर्षामध्ये त्यांनी ओडीसाच्या राजकारणामध्ये स्वत:चे वेगळे वर्चस्व निर्माण केले. २००७ साली ओडीसामधील सवीत्तम आम दार म्हणून ओडीसा विधानसभेतर्फे त्यांना प्रतिष्ठीत अश्या नीलकांता पुरस्काराने गौरवण्यात आले होते. त्यांना हे सारे यश सहज मिळाले असे नाही, त्यासाठी आयुष्यातील प्रत्येक संकटाशी त्यांनी निकराने लढा दिला. आपल्या पती आणि दोन मुलांना गमावून देखील त्यांनी हार मानली नाही, सारे दु:ख विसरून त्या पुन्हा उभ्या राहिल्या आणि स्वत:ला सिद्ध केले.

२०१५ साली वयाच्या ५९ व्या वर्षी त्यांनी इतिहास घडवला, कारण त्या वर्षी झारखंडच्या पहिल्या महिला राज्यपाल म्हणून त्यांची निवड करण्यात आली होती. तब्बल २० वर्षांच्या दांडग्या अनुभवासह त्यांनी आपल्या आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणासाठी सर्वतोपरी प्रयत्न केल्याचे दिसून येते, आज त्या भारतीय जनता पक्षाचा राष्ट्रीय स्तरावरील आदिवासी चेहरा म्हणून ओळखल्या जा- तात. त्यांच्या कौतुकास्पद आणि कार्यक्षम कारकिदीर्मुळेच राष्ट्रपती पदाच्या शर्यतीमध्ये त्यांनी स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. जर भारतीय जनता पक्षाने पुढील राष्ट्रपती म्हणून द्रौपदी मुर्मू यांची निवड केली तर भारतीय जनता पक्षाची ती एक स्मार्ट खेळी मानली जाईल, यामुळे त्यांची अदिवासी विकास विरोधी प्रतिमा तर पुसली जाईलच, पण सोबतच येणाऱ्या निवडणुकांमध्ये आदिवासी समाजाची भरघोस मतं देखील त्यांच्या पदरात पडतील. याच गोष्टींमुळे की काय पण नरेंद्र मोदी यांनी देखील द्रौपदी मुर्मू यांनाच राष्ट्रपतीपदासाठी पदासाठी पसंती दिली आहे. या पाठीमागे भाजपची राजकीय खेळी आहे, याबाबत दुमत असू शकत नाही. आभासी किंवा औपचारिक जातनिरपेक्षता पाळण्यात भाजप चतुर पक्ष समजला जातो. तसे असणे ही कुठल्याही पक्षाची राजकीय गरज आसते, हे राजकीय वास्तव मान्यच करायला पाहिजे. कारण राजकारणात सर्वप्रथम पक्ष हितसंबंधाला प्राधान्य असते, नंतर सर्वसामान्य हितसंबंधांचा विचार केला जातो. हा संकेत सर्वच राजकीय पक्षांनी पाळलेला दिसून येतो.

राष्ट्रपतीपदावरील व्यक्तीची निवड करण्याचे सर्व अधिकार त्या त्या राजकीय पक्षाला किंवा राजकीय आघाडीला असतात. काँग्रेसने त्यांच्या सत्ताकाळात या पदावरील व्यक्तीची निवड करताना पक्षाची राजकीय गैरसोय होणार नाही किंवा पक्षीय हितसंबंध दुरावले जाणार नाहीत हे पाहिले. योगायोगाने त्यात काही चांगले राष्ट्रपती होऊन गेले. पण आतापर्यंत जवळपास कोणत्याही राष्ट्रपतींनी पक्षीय हितसंबंध अव्हेरलेले नाहीत. जर द्रौपदी मुर्मू या भारताच्या १४ व्या राष्ट्रपती म्हणून विराजमान झाल्या तर ती नक्कीच आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट असेल. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत यशवंत सिन्हा हे द्रौपदी मुर्मू यांच्या विरोधी पक्षाचे उमेदवार आहेत. मात्र, केंद्रात बहुमत आणि अनेक राज्य सरकारांचा पाठिंबा मिळाल्याने द्रौपदी मुर्मू यांचा विजय निश्चित मानला जात आहे. जर द्रौपदी मुर्मू देशाच्या पुढच्या राष्ट्रपती झाल्या तर त्या एकाच वेळी अनेक विक्रम प्रस्थापित करतील.

**देशाला सर्वात तरुण राष्ट्रपती मिळणार**

जर द्रौपदी मुर्मू देशाच्या पुढील राष्ट्रपती झाल्या तर त्या भारताच्या सर्वात तरुण राष्ट्रपती असतील. द्रौपदी मुर्मू यांचा जन्म २० जून १९५८ रोजी झाला. त्या ६४ वर्षांच्या आहेत. २५ जुलै रोजी जेव्हा त्या पदाची शपथ घेतील तेव्हा त्यांचे वय ६४ वर्षे, १ महिना, ८ दिवस असेल. द्रौपदी मुर्मू यांच्या आधी देशाच्या सर्वात तरुण राष्ट्रपतीचा विक्रम नीलम संजीव रेड्डी यांच्या नावावर होता, ज्यांची १९७७ मध्ये बिनविरोध निवड झाली होती. त्यांनी अध्यक्षपद स्वीकारले तेव्हा त्यांचे वय ६४ वर्षे २ महिने ६ दिवस होते. द्रौपदी मुर्मू या पहिल्या आदिवासी नेत्या राष्ट्रपती असतील राष्ट्रपतीपदाची सूत्रे हाती घेताच द्रौपदी मुर्मू आणखी एक विक्रम करणार आहेत. देशाच्या या घटनात्मक पदावर आदिवासी समाजाचा एकही नेता येऊ शकला नाही. द्रौपदी मुर्मू या आदिवासी नेत्या आहेत. या समाजातून आजवर देशाला एकही पंतप्रधान मिळाला नाही किंवा राष्ट्रपतीही मिळालेला नाही. मुर्मू या निवडणुकीत विजयी झाल्या तर त्या पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती होण्याचा विक्रम नावावर करतील.

# बंडखोरी हिंदूत्वावर,ओबीसी मुद्द्यावर का नाही...?

भारतीय इतिहासात आजवर जेवढ्या बंडखोऱ्या झाल्यात त्या सर्व वैदिक ब्राह्मणांच्या छळाला कंटाळून झालेल्या आहेत. या बंडखोऱ्यां समतेसाठी चाललेल्या संघर्षाच्या महामार्गावरील दिपस्तंभ आहेत. अगदी ९०-९१ सालापर्यंतच्या बंडखोऱ्या जातीव्यवस्थे विरूद्धच्या असंतोषामुळे झालेल्या आहेत. आता २०२२ साली होणारी बंडखोरी वैदिक ब्राह्मणांच्या हिंदूत्वासाठी होणार असेल तर याचा अर्थ काय काढायचा? काय वैदिक ब्राह्मणांचा छळ संपलेला आहे काय? जातीय अन्याय-अत्याचार संपले आहेत काय? दलित, आदिवासी व ओबीसी हे सर्व सुखी, संपन्न व प्रतिष्ठीत झाले आहेत काय? आज आरक्षणासाठी संपूर्ण देशात ओबीसींचा आक्रोश सुरू असतांना व हा अन्याय वैदिक ब्राह्मणांच्या हिंदूत्ववाद्यांकडून होत असतांना राजकीय बंडखोरी ओबीसी मुद्द्यावर होण्याएवजी हिंदूत्वाच्या मुद्यावर का होते आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधू या उत्तरार्धात!

व्ही.पी. सिंगांनी १९८८-८९ साली काँग्रेस सोडली. त्याकाळी भारतीय राजकारणावर समाजवादी व कम्युनिस्ट चळवळीचा प्रभाव होता, तसेच मंडल आयोगाचे आंदोलनही जोरात होते. त्याकाळी व्हि.पी. सिंगांनी काँग्रेस सोडतांना समाजवादी-कम्युनिस्टांच्या प्रभावाखालील कामगार व ओबीसी चळवळीत सुरक्षितता शोधली. याच चळवळीच्या पायावर त्यांनी जनता दल स्थापन केला व काँग्रेस -भाजपाला पराभूत करीत केंद्रसत्ताही मिळविली. जनता दलाचा कामगारवगीय वोटबँकेचा पाया मजबूत करण्यासाठी त्यांनी अनेक क्रांतीकारक कामगार कायदे बनविलेत. जनता दलाचा दलित वोटबँकेचा पाया मजबूत करण्यासाठी त्यांनी एट्रासिटी एक्ट सारखे कायदेही केलेत, बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा संसद भवनात लावणे व जयंतीची सुटी जाहीर करणे, हा त्याचाच भाग होता. ओबीसी वोटबँकेचा पाया अधिक मजबूत करण्यासाठी त्यांनी मंडल आयोग अमलबजावणीला प्रत्यक्षात सुरूवातही केली. परंतू ब्राह्मणी छावणीच्या भाजपाने राममंदिराचे सांस्कृतिक आंदोलन सुरू केल्याने ओबीसी वोटबँक व हिंदूत्वाची वोटबँक यात घमासान युद्ध सुरू झाले. रामंदिराच्या सांस्कृतिक युद्धाच्या लाटेत कामगारवगीय वोटबँक मूळ धरू शकली नाही कारण कम्युनिस्टांनी कधीच सांस्कृतिक व जातीय मुद्दे गांभिर्याने घेतलेच नाहीत. व दलित चळवळीचाही प्रभाव राहीला नाही कारण त्यांनीही या सांस्कृतिक मुद्द्याकडे दुर्लक्ष्य केले. या युद्धा-तून हिंदू वोटबँक तयार झाल्याने भाजपा काही प्रमाणात यशस्वी झाली, मात्र जात जाणीवा जागृत झाल्यामुळे ओबीसी वोटबँकही गतिमान होत राजकीय पाळेमुळे पकडू लागली होती. बिहारात लालूंचा पक्ष तसेच उत्तरप्रदेशात मुलायलसिंगांचा व कांशिरामजींचा पक्ष ओबीसी वोटबँकेमुळे सत्तेत येऊन ब्राह्मणी छावणीच्या हिंदूत्वाला शह देत होते. ओबीसी वोटबँकेच्या दबावाखाली काही राज्यांमध्ये ओबीसी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री बनवावे लागले होते. याच ९१-९२ च्या काळात छगन भूजबळसाहेबांनी शिवसेनेतील पहिली बंडखोरी केली. भुजबळ साहेबांनी ब्राह्मणी शिवसेनेला लाथ मारतांना ओबीसी मुद्दा वापरला व काँग्रेसमध्ये जाऊन सुरक्षितता मिळवीली होती.

१९९०-९१ साली भूजबळसाहेबांनी शिवसेना सोडत असतांना जी सुरक्षितता ओबीसी चळवळीत शोधली, ती ओबीसी चळवळीची सुरक्षितता आता २०२२ साली शिवसेना फुटत असतांना कुठे गेली? आज शिव-सेना सोडत असतांना बंडखोर आमदार ओबीसीऐवजी हिंदूत्वाची भाषा का करीत आहेत? वास्तविक आज महाराष्ट्रात पायलीच्या पंधरा ओबीसी संघटना आहेत. ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी या संघटना आंदोलनही करीत आहेत. ओबीसींमध्ये जागृतीही वाढत आहे. असे असतांना ओबीसी चळवळीचा प्रभाव राजकारणावर का पडत नाही, याचा शोध घेतला व त्यातून बोध घेऊन काम सुरू केले तरच महाराष्ट्रात ओबीसी राजकारण प्रभावी होईल व राजकारणी-सत्ताधारी ओबीसी मुद्दा गांभिर्याने घेतील.

१९९०-९१ पर्यंतची ओबीसी चळवळ गल्ली-बोळातल्या छोट्या-मोठ्या प्रमाणिक कार्यकर्त्यांनी उभी केलेली होती. त्यामुळे तीचा राजकिय प्रभाव व्हि.पी. सिंगांना खेचून आणण्याईतका प्रभावी होता. याच प्रभावी चळवळीचा वापर करीत छगन भूजबळसाहेबांनी सूरक्षितता शोधली व त्यामुळेच त्यांना शिव-सेनेतून उडी मारणे सोपे झाले.

मात्र भूजबळांची ही उडी शिवसेनेच्या ब्राह्मणी आगीतून निघून काँग्रेसच्या ब्राह्मणी फुफाट्यात पडणारी होती. म्हणून त्यांच्या या उडीमुळे ओबीसी चळवळ मजबूत होण्याएवजी काँग्रेसी मराठा-ब्राह्मणांचे राजकारण मजबूत झाले. ओबीसी नेत्यांमुळे मजबूत झालेल्या या मराठा-ब्राह्मण राजकारण्यांनी सत्तेचा वापर करीत ओबीसी चळवळीचेच पाय कापायला सुरुवात केली. त्यानंतर सर्वच राजकीय पक्षांनी प्रत्येक ओबीसी जातीत आपापल्या पक्षांचे दलाल ओबीसी नेते व कार्यकर्ते तयार केलेत. ७३ वी व ७४ वी घटनादुरूस्ती करून ९३-९४ साली आलेला राजकीय आर-क्षणाचा पंचायत राज कायदा अशा दलित-ओबीसी दलालांची निर्मिती करण्यासाठीच होता. ओबीसी चळवळीचा उपयोग या सर्व पक्षांनी आपले जातीय राजकारण मजबूत करण्यासाठी केला. महाराष्ट्रात आज ज्या ओबीसी संघटना स्वत:ला स्वतंत्र व सामाजिक म्हणवितात, त्या सर्व कोणत्या ना कोणत्या पक्षाला बांधलेल्या आहेत. निवडणूका आल्यात की या संघटनांचे नेते व कार्यकर्ते



कोणत्या तरी प्रस्थापित पक्षासाठी काम करतात व त्यांना निवडून आणतात. बऱ्याच ओबीसी संघटना व त्यांचे ओबीसी पदाधिकारी आजही मराठ्यांच्या दबावाखाली व प्रभावाखाली वावरतात. या दलालांमुळेच आज ओबीसी चळवळ असूनही नसल्यासारखी झालेली आहे. विधान परीषदेच्या आमदारकीकडे डोळे लावून बसलेले हे ओबीसी दलाल नेते नगरसेवकाच्या तिकिटावरही खूष होतात. असे पायलीचे पंधरा ओबीसी नेते, विचारवंत व कार्यकर्ते बाजारात स्वस्तात मिळत असतांना ५२ टक्क्यांच्या ओबीसी वोटबँकेला कोण विचारतो? अशा प्रभावहीन ओबीसी चळवळीच्या मुद्द्याचा वापर कोणी राजकारणी बंड करतांना का वापरील?

या उलट १९८५ पासून सुरू झालेल्या राममंदिराच्या सांस्कृतिक आंदोलनातून ब्राह्मणी छावणी मजबूत होत गेली. या ब्राह्मणी छावणीचा राजकीय प्रभावही वाढत गेला व त्यातून हिंदू वोटबँक निर्माण होत गेली. हिंदूत्वाची वोटबँक निर्माण करण्यासाठी असंख्य संघ कार्यकर्ते रात्रंदिवस राबत होते. हे कार्यकर्ते कोणत्याही क्षेत्रात गेलेत तरी त्या क्षेत्राचा वापर ते हिंदूत्वासाठीच करीत होते! हे संघ कार्यकर्ते मिडियाच्या क्षेत्रात गेलेत तर तेथे ते हिंदू-मुस्लीम दंगली पेटविण्यासाठी त्या मिडियाचा वापर करतात. मिडियात काम करणारे ओबीसी कार्यकर्ते कधीच ओबीसी मुद्दयांवर मिडियात चर्चा होऊ देत नाहीत. संघ-कार्यकर्ते एखाद्या राजकीय पक्षात गेलेत तर ते त्या पक्षाचा वापर हिंदू वोटबँक मजबूत करण्यासाठी करतात. ओबीसी कार्यकर्ते एख-ाद्या पक्षात गेलेत की ते पक्षाचे दलाल बनतात व प्रस्थापितांचे ओबीसीविरोधी राजकारण मजबूत बनवितात. जातीच्या पलिकडे जाऊन हिंदू वोटबँक तयार झाली, मात्र जात बाजूला ठेऊन कोणीही कार्यकर्ता “ओबीसी’ बनायला तयार नाही. आज ज्या ओबीसी नावाने संघटना चालतात, त्या सर्व विशिष्ट एकाच जातीच्या संघटना आहेत. संघटनेच्या नावात “समता’ शब्द असतो. मात्र प्रत्यक्षात संघटनेत सर्व माळीच असतात. या सघटनेच्या माध्यमातून पुढे जे आमदार-खासदार बनतात, तेही माळी जातीचेच असतात. अगदी छटाकभर असलेले ओबीसी महामंडळ व विद्यापीठातील अध्यासनेसुद्धा नाभिक, धोबी जातीपर्यंत जाउ देत नाहीत. याच पद्धतीने कुणबी, तेली, धनगर, धोबी वगैरे जातीच्या नेत्यांनी आपापल्या जातीच्या ओबीसी संघटना निर्माण केलेल्या आहेत.

अशा एकजातीय ओबीसी संघटनांचा राजकारणावर काय प्रभाव निर्माण होणार? ९०-९१ पर्यंतच्या चार पिढ्यांनी मोठ्या कष्टाने जी ओबीसी चळवळ व ओबीसी वोटबँक तयार केलेली होती, ती चळवळ ९०-९१ नंतरच्या या दलाल ओबीसी नेत्यांनी व विचारवंतांनी आपल्या व्यक्तीगत स्वार्थासाठी खतम केली. या उलट हिंदूत्वाच्या ब्राह्मणी वोट बँकेने मुख्यमंत्री, प्रधानमंत्री वगैरे मोठी पदे ब्राह्मणेतर जातींना दिलीत. हिंदूत्वाची वोटबँक सर्वजातीय बनवीली गेली. अशा प्रकारे ओबीसी वोटबँकेला शह देत-देत आज हिंदुत्वाची वोटबँक देशावर राज्य करीत आहे. त्यामुळेच देशातील बहुसंख्य राजकारणी आपली सुरक्षितता हिंदुत्वात शोधतात.

काँग्रेस व राष्ट्रवादीसारख्या तुलनेने सेक्युलर असलेल्या पक्षांसोबत सत्ता उपभोगत असतांनाही शिवसेनेला आपली हिंदूत्वाची वोटबँक सांभाळण्यासाठी अयोध्यावाऱ्या कराव्या लागत आहेत. एवढा जबरदस्त राजकीय प्रभाव हिंदू वोटबँकेचा आहे. अशा परिस्थितीत शिवसेनेचे बंडखोर आपली सुरक्षितता हिंदू वोटबँकेतच शोधतील व भाजपाच्याच आश्रयाला जातील. जर महाराष्ट्रात ओबीसी चळवळ मजबूत राहीली असती व ओबीसींचा एखादा प्रभावशाली राजकीय पक्ष अस्तित्वात राहीला असता, तर या सर्व बंडखोरांनी शिवसेना सोडतांना हिंदूत्वाच्या मुद्द्याचा वापर न करता ओबीसी आरक्षणाचा मुद्दा वापरला असता व ओबीसी चळवळ अधिक मजबूत झाली असती. बिहारमध्ये नितीशकुमार भाजपासोबत सत्तेत आहेत, तरीही नितीशकुमार ओबीसी चळवळीचेच राजकारण करतात, कारण बिहारमध्ये ओबीसींची वोटबँक व ओबीसींचा स्वाभीमानी पक्ष (राजद) प्रभावशाली आहेत. त्यामुळे नितीशकुमार ओबीसी जनगण-नेचा ठराव मांडतात व भाजपाला आपले हिंदूत्व गुंडाळून ओबीसी जनगणनेला पाठींबा द्यावाच लागतो. तसेच ओबीसींचे प्रभावशाली राजकारण उत्तरप्रदेशमध्ये आहे. तामीळनाडु, बिहार, उत्तरप्रदेशप्रमाणे महाराष्ट्रातही ओबीसी वोटबँक मजबूत करायची असेल तर ओबीसींचा स्वतंत्र स्वाभीमानी पक्ष स्थापन होणे गरजेचे आहे. आम्ही त्याची सुरुवात केली आहे. “ओबीसी राजकीय आघाडी” नाव-ाचा पक्ष स्थापन करून ओबीसींच्या भक्कम राजकारणाची सुरुवात आम्ही केलेली आहे. आपापल्या ओबीसी संघटनांचे अस्तित्व कायम ठेवून या राजकीय आघाडीत सामील होता येईल. महाराष्ट्रातील प्रमाणिक कार्यकर्त्यांनी या पक्षात येऊन ओबीसी वोटबँक मजबूत करावी, असे आवाहन करीत आहोत.

लेखक- प्रा. श्रावण देवरे
संपर्क मोबाईल-८८३०१२७ २७०
ईमेल-s.deore2012@gmail.com

# राजकीय छिनालांच्या तावडीत लोकशाही

गुंडागर्दी आणि अवैध संपत्तीतून निर्माण झा-लेली अनैतिक पैदास म्हणजे अलीकडच्या काळातील आम दारकी, खासदारकी, मंत्रिपद आणि सत्ता! त्याला काही अपवाद असतीलही..पण ही नवी छिनाल संस्कृती आता राजकारणात सर्वमान्य झा-लेली आहे. कोणताही पक्ष त्याला अपवाद नाही. किंवा ह्या घटना तशा अपव-ादात्मक देखील राहील्या नाहीत. कालपर्यंत ज्यांच्या नावाने भ्रष्टाचाराचे आरोप केले, ऊर बडवून, बांगड्या फोडून गळे काढले, त्याच जनावराच्या सोबत संसार करायला नेत्यांना जराही लाज वाटत नाही. ही नवी राजकीय संस्कृती ‘कोठ्या’तून निघून चौकात राजरोस धंदा करायला बसलीय. त्यातुनच यांची करोडो, अब्जावधी रुपयांची कार्पोरेट कार्यालये उभी राहिलीत. २०१४ नंतर ह्याला देशात उधाण आलं आहे.



कर्नाटकातील सरकार पाडलं. मध्यप्रदेशातील सरकार पाडलं. बिहार मध्ये पास-वान यांच्या पक्षाचे ६ पैकी ५ खासदार फुटले, एम आय एम पक्षाचे ५ पैकी ४ आमदार फुटलेत. महाराष्ट्रात तर अगदी निर्लज्जपणाचा कळस झाला. न्यायालये, राज्यपाल यांनी देखिल साऱ्या मर्यादा तोडल्या. कुणालाही लाज वाटत नाही. पक्ष कोणताही असू द्या किंवा अपक्ष असू द्या. सत्ता आणि पैसा फेकल्यास ते काहीही करायला तयार आहेत. उत्तर प्रदेशात स्थ-ानीय स्वराज्य संस्थेत भाजपाचा सफाया झाला होता. तरीही अध्यक्षपदी मात्र भाजपचे लोक प्रचंड मोठ्या प्रमाणात निवडून आले, याचा नेमका अर्थ काय? गुंडागर्दी, पैसा या व्यतिरिक्त दुसरे कोणते कारण असू शकते? महाराष्ट्राच्या बाबतीत देखील संतापजनक बाब अशी, की विश्वास दर्शक ठराव मांडण्याची वेळ असताना काँग्रेसचे चक्क ११ आमदार गैरहजर होते? यांना कुणी अफू चारली होती की गांजा? की आणखी काही वेगळा व्यवहार झाला होता? धक्कादायक बाब म्हणजे यात माजी मंत्री, माजी मुख्यमंत्री देखील सामिल होते!

कसल्या विकाऊ लोकांच्या हातात आपली लोकशाही गेली आहे बघा. ही किड साऱ्याच पक्षांना आणि साऱ्याच जाती धर्माच्या लोकांना लागली आहे. सरकार कोणत्याही पक्षाचं असो, यांच्या हिस्सेवाटण्या ठरलेल्या असतात. त्यांचे मीटर सुरूच असते. त्यांचं फारसं काही बिघडत नाही.

हा राजकीय छिनालपणा आपण असाच चालू देणार आहोत का? उद्या देशाचे तुकडे झाले तरी ह्या लोकांना काहीही सोयर सूतक नाही! त्यातही आपलं आपलं कमिशन घेऊन हे लोक चूप बसतील! विचार तुम्हाआम्हाला करायचा आहे! विचार जनतेला करायचा आहे!

मी कुणाला काय बोलू
या उन्हाला काय बोलू
बाग जर बैमान झाली..
कुंपणाला काय बोलू?

पुढच्या पिढ्यांचं भवितव्य बर्बाद होऊ नये असं वाटत असेल, देश आणि लोकशाही सुरक्षित राहावी असं वाटत असेल, तर या राजकीय छिनालपणाच्या विरुद्ध मोठा लढा उभारावा लागेल. युवकांना पुढं यावं लागेल! त्याशिवाय पर्याय नाही! बघा.. विचार करा!

**तूर्तास एवढंच..!**

**ज्ञानेश वाकुडकर**
**अध्यक्ष लोकजागर**
**९८२२२७८९८८**

## ट्रेंड्स प्रस्तुत करत आहे भारतातील सर्वात मोठा फॅशन सेल- ट्रेंड्स शॉपिंग फेस्टिव्हल




**गोंदिया:**जुलै २०२२: ट्रेंड्स, भार-तातील सर्वात मोठा फॅशन रिटेलर, जो नवीनतम -ट्रेंड, सर्वात नवीन शैली आणि सवीत्तम फॅशनसाठी ओळखला जातो, भारता-तील फॅशन प्रेमींना फॅशन अप करण्यासाठी सर्वात लोकप्रिय फॅशन सेल - ट्रेंड्स शॉपिंग फेस्टिव्हल आणण्यासाठी सज्ज आहे.

ट्रेंड्स आपल्या नावाला जागून ग्राहकांपर्यंत सवीत्कृष्ट फॅशन आणि ब्रँड्स आणण्यासाठी सज्ज आहे, त्याच्या नावाप्रमाणेच ट्रेंड्स शॉपिंग फ`स्टिव्हल ही फॅशनची आजपर्यंतची सर्वात मोठी विक्री आहे ज्यामध्ये एक विशेष ऑफर आहे तुम्ही रु. ३४९९ ची खरेदी करा - आणि पुरूषांचे पोशाख, लहान मुलांचे पो-शाख आणि महिलांच्या पोशाखांच्या विस्तृत श्रेणीवर रु. ३४९९ किमतीचा मर्चेंडाइज मोफत मिळवा. कोणतीही कसर न ठेवता आणि सर्वात आकर्षक कारणे देत - देशभरातील ग्राहकांना आकर्षक किंमती, खात्रीशीर भेटवस्तू, बक्षिसे आणि पॉईटस, आणि न ऐकलेल्या ऑफर्स सह - तुम्ही ट्रेंड्स शॉपिंग फेस्टिव्हल सेल चुकवू शकत नाही

ग्राहकांना त्यांच्या फॅशनच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी खर-`दी करण्यास सक्षम करण्यासाठी तुम्हाला कमी किमतीत आणि अतुलनीय डीलमध्ये नवीनतम शैली मिळतील.

ट्रेंड्स देशातील फॅशन प्रेमींसाठी किरकोळ विक्रेते बनले आहेत आणि खास क्युरेट केलेले पुरुष आणि महिलांचे पोशाख आणि ॲक्सेसरीजचे कलेक्शन आणते.

# ओबीसींच्या राजकीय आरक्षणाची स्थिती आणि गती

**गोंदिया:** ब्रिटीश सरकारने ११९३१ मध्ये जी खानेसुमारी केली, त्यानुसार मागावर्गीय जाती, जमाती प्रमाणेच अन्य जाती सुद्धा मागास आहेत आणि त्यांची संख्या ही सुमारे ५२ टक्के आहे असे स्पष्ट नमूद केले आहे. त्यानुसार भारताच्या स्वातंत्र्यानंतर अन्य मागासवर्गीयांची लोकसंख्या अनेक आयोगाने आणि समित्यांनी ५२ टक्के एवढेच ग्राह्य धरुन त्यांना संविधानात्मक सवलती देऊ केल्या. मंडल आयोगाने देखील नोकरी विषयक आणि शैक्षणिक आरक्षण देताना ५२ टक्के ही लोकसंख्या ग्राह्य धरुन या सवलती संविधानात्मक केल्या. सुप्रीम कोर्टाच्या इंदर सहानी विरुद्ध भारत भारत सरकार या निकालानुसार ५२ टक्के ओबीसींना केवळ २७ टक्के आरक्षण हे नोकरी विषयक आणि शैक्षणिक विषयक देण्यात आले. महाराष्ट्र शासनाने एका अध्यादेशानुसार १९९२ मध्ये ५२ टक्के ओबीसींना स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये २७ टकके आरक्षण बहाल केले. परंतु या सर्व आर-क्षणाची वाताहत झालेली आपल्या,ा दिसते. म्हणजेच ओबीसींच्या वाटयाला कोणतेही खरे आरक्षण मिळाले नाही. वास्तविक पहाता तो स्वनिर्माता आहे. त्यातच २०21 मध्ये विकास गवळी विरुद्ध महाराष्ट्र सरकार या खटल्यात यांची बाजू ग्राहय धरुन राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात ओबीसींचा एमिरीकल डाटा दाखल करावा तोपर्यंत ओबीसींचे राजकीय आरक्षण स्थगित करावे असे निर्देश दिले. त्यानुसार महाराष्ट्र सरकारने गेल्या एक वर्षापासून ओबीसींचे शास्त्रीय सांख्यिकीय माहिती जमा करण्याचे काम सुरु करणे अपे-क्षीत होते. मध्यंतरी ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा अध्यादेश काढणे निवडणूक आयोगाचे अधिकार कमी करणे, राज्य मागासवर्ग आयोग करुन घाईघाईन डाटा तयार करण्याचे काम करुन घेऊन ते सर्वोच्च न्यालयात मांडणे असे विविध प्रकार गेल्या वर्षभरारत राज्य सरकारने केले.

भांबावलेल्या व स्थितीत सरकारकडून काही ठोस उपाय न झाल्यामुळे काही स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका या ओबीसी आरक्षणाशिवाय पार पडल्या. हीच गोंधळलेली स्थिती राहिली तर आगामी निवडणूका देखील ओबीसींच्या आरक्षणाविाय पार पडतील आणि राज्य सरकारच्या या निष्क्रियतेमुळे, उदासीनतेमुळे ओबीसींचे मोठे राजकीय नुकसान होणार आहे. असे दिसते. ओबीसींचे स्थानिक स्वराज्य संस्थातील आरक्षण टिकविण्यात सरकारला अपतश आले व त्याची किंमत सरकारला आगामी निवडणुकांत चुकवावी लागेल हे तेवढेच खरे. ओबीसींच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरक्षणाविषयी




सरकार काहीच करत नाही हा आक्षेप नसून योग्य दिशेने हे आरक्षण टिकविण्याठी उपाय करत नाही याबाबत ओबीसीमध्ये संताप आहे. नुकतेच मध्यप्रदेश सरकारने ओबीसींचे राजकीय आरक्षण टिकविण्यासाठी युद्धपा-तळीवर काम केले भे अभ्यासपूर्ण आणि सुप्रीम कोर्टात टिकेल या पद्धतीने केले. या कार्यपद्धतीमुळे मध्य प्रदेशात आता ओबीसींना ३५ टक्के राजकीय आरक्षण स्थापित झाल्याचे नुकते परळी येथील कार्यक्रमात तेथील मुख्यमंत्री चौव्हाण यांनी सांगितले. हा संदर्भ यासाठी की, काय महाराष्ट्र सरकारला सुद्धा मध्य प्रदेशने केलेल्या कामाचे मॉडेल स्विकारता येणार नाही काय? सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशाची प्रत घेऊन त्या अनुषंगाने काम का करू नये? महाराष्ट्र सरकारने अशा धोरणानुसार काम करावे अशी देखील अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बिहार सरकारने ओबीसींचे राजकीय आरक्षण टिकविण्यासाठी ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी सर्व राजकीय पक्षांची संमती घेतली आहे. ओबीसींचे जातिनिहाय जनगणना करण्याला बिहार सरकारने प्राथमिकता दिले आहे. केंद्र सरकारने सुद्धा बिहार सरकार प्रमाणे देशात ओबीसंची जातीनिहाय जनगणना केली पाहिजे. असा सूर आता संपूर्ण देशात ओबीसींचा दिसून येत आहे. महाराष्ट्र सरकारने नुकतेच ओबीसींच्या कार्यकर्त्यांची संघटनांच्या प्रतिनिधींची तसेच पंजीकृत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची सुनावणी विभागानुसार घेतली आहे. ही सुनावणी नुकतीच संपली आहे. दुसरा टप्पा महाराष्ट्र सरकारने महत्वाचा सुरु केला आहे. राज्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्था निहाय मतदार यादीतील ओबीसींची संख्या आडनावानुसार निश्चीत केली जात आहे. (हा मध्यप्रदेश सरकारने वापरलेला फार्मूला आहे) त्यामुळे असा डेटा सर्वोच्च न्यालयात टिकेल असा आशावाद कार्यकर्त्यांना आहे. राज्याचे अतिरिक्त सचिव राजेशकुमार यांनी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना नुकतेच असा डाटा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. डेटा जमा करण्याची प्रणाली, कोड, क्रमांक इत्यादी अनुषंगाने हे काम दोन-चार दिवसात सुरू होईल असे संकेत आहेत. जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, तलाठी,कृषी सहायक आदिंची यंत्रणा हे काम लवकरच सुरु करणार असल्याचे वर्तमानोत्रातील बातम्या वरुन दिसते. स्थानिक स्वराज्य संस्था निहाय मतदार याद्या या समोर ठेवून त्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि खुल्या प्रवर्गातील मतदार बाजूला करुन उर्वरित मतदार यादी आडनावाप्रमाणे जातीनिहाय करण्यात येणार असल्याचे दिसते. या ठिकाणी प्रश्न एवढाच येतो की, आडनावावरुन जात निश्चित होईल का? यंत्रणेतील लोक चर्चा करुन संभ्रमीत असतील आ आडनावांच्या व्यक्तीशी, कार्यकर्त्यांशू चर्चा करुन हे नाव कोणत्या प्रवर्गातील आहे हे निश्चित करतील. लक्षात हे असावे, की हा एम्रीकल डाटा तयार करण्यासाठी शासन यंत्रणा ही सक्षम आहे. यात अन्य खाजगी लोकांचा सहभाग नाही. असेल तो नगण्यच. सर्वोच्च न्यायलयाच्या निर्देशाप्रमाणे १२ जुलै २०२२ पुर्वी राज्य सरकारला ओबीसींची शास्त्रीय साख्यिकीय माहिती अर्थात एम्पिरिकल डाट सर्वोच्च न्यायलयात मांडायचा आहे. हा डाटा अधिक अचुक, वस्तुनिष्ठ तयार करावा आणि तो योग्य पद्धतीने आणि मुदतीच्या आत राज्य सरकारने मांडावा एवढीच माफक अपेक्षा आहे. डाटा तयार करण्यासाठी मध्यप्रदेशचा फार्मूला सरकारने स्विकारला ही स्वागतार्ह गोष्ट आहे पण बिहार सरकारने ओबीसींची जातीनिहाय जनगणना सुरु केली आहे तिची तंतोतंत अनुकरण महाराष्ट्र सरकारने करावे आणि २०२४ च्या आत केंद्र सरकारने सुद्धा ओबीसींचे जातनिहाय जनगणना करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घ्यावा. जेणेकरुन राजकीय आरक्षण ओबीसींना मिळेल आणि न्यायाचे राज्य स्थापित होईल असे करावे. आपण लोकल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारलेली आहे यावर शिक्कामोर्तब करावे धन्यवाद.

**प्रा.लक्ष्मण गुंजाळ**
**मो.९६६५१५१३८**

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता ,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# बिलाची कटकट,खिशालाही हातभार

## पर्यावरणप्रेमी ग्राहकांचा कल: अनुदानामुळे होतोय फायदा

**गोंदिया:** सूर्यापासून मिळणाऱ्या उर्जेतून वीज निर्मिती व वापरासाठी शासनाकडून आवाहन करण्यात येत आहे. यामुळे जिल्ह्यातील ५८० ग्राहकांनी सौरउर्जा यंत्रणा बसविली असून घरातच ते वीज निर्मित करुन आपल्या घरात वापरत आहेत. सौरउर्जेमुळे संबंधित ग्राहकांचा महावितरणाच्या विजेचा वापर कमी झाला असून, बिलाच्या रकमेतही बऱ्यापैकी घट झाली आहे.

पारंपरिक साधनांवरील ताण कमी करण्यासाठी सौरउर्जेचा पर्याय योग्य असून याबाबत ग्राहकही जागरुक होऊ लागले आहेत. यामुळे पारंपरिक विजेची बचत होत असून ग्राहकांवरील आर्थिक भारही कमी झाला आहे. केंद्र शासनाकडून १ ते ३ किलो वॅट सौरउर्जेसाठी ग्राहकांना ४० टक्के अनुदान देण्यात येत आहे. तसेच ४ किलो वॅटपासून पुढे २० टक्के अनुदान दिले जात आहे. विशेष म्हणजे यासाठी जिल्ह्यात ११ एजंसीकडे काम देण्यात आले आहे. सौरउर्जा प्रकल्प लावल्यास ग्राहकांच्या बिलात घट येत असून शिवाय दरमहा वीज बिल भरण्याच्या कटकटी पासूनही त्यांची सुटका होत आहे. शिवाय संबंधित ग्राहकांकडील बचत वीज महावितरण घेत आहे. यामुळेच ग्राहकही सौरउर्जेकडे वळू लागले आहेत. हेच कारच आहे की, जिल्ह्यात आतापर्यंत ५८० ग्राहकांनी याचा लाभ घेतला आहे.

**तालुकानिहाय ग्राहकांची संख्या**

| | |
|---|---|
| आमगाव– | ४७ |
| देवरी– | ०४ |
| अर्जुनी–मोरगाव– | १५ |
| सडक–अर्जुनी– | ०८ |
| सालेकसा– | ०६ |
| गोंदिया ग्रामीण– | ८० |
| गोंदिया शहर– | ३९२ |
| गोरेगाव– | ०९ |
| तिरोडा– | १९ |



### वीज बिलातून सुटका

सौरउर्जा युनिटमुळे वीज बिलात बचत होतेच शिवाय शिल्लक वीज महावितरण वितक घेत असल्याने त्याचाही फायदा होतो. विशेष म्हणजे दर महिना वीज बील भरण्याच्या कटकटीपासून सुटका होत असल्याने सौरउर्जा युनिट फायद्याची आहे.

**प्रणव रहांगडाले**

विजेच्या लपंडावामुळे होणारा त्रास सौरउर्जा युनिट बसविल्यामुळे वाचला आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर पूर्ववत होईपर्यंत वाट पाहावी लागत असे. शिवाय दरमहा होणाऱ्या विजबिलात ही बचत होण्यास मदत झाली आहे.

**प्रतीक कदम**

### सौरउर्जेसाठी करा ऑनलाईन अर्ज

महावितरणच्या महाडिस्कॉम डॉट इन या संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रांची यादी व ऑनलाईन अर्ज उपलब्ध असून ग्राहक ऑनलाईन अर्ज करु शकतात.

कोणाला करता येणार अर्ज

घरगुती ग्राहकांना गच्चीवरील सौरउर्जेसाठी अर्ज करता येतो. ग्राहकांच्या घरावर सौर यंत्रणा उभारणीची व्यवस्था होईल एवढी पुरेशी जागा असणे अनिवार्य आहे.

### किती मिळते अनुदान

घरगुती ग्राहकांना घराच्या छतावर सौरउर्जा युनिटद्वारे १ ते ३ किलो वॅट उर्जानिर्मिती करणारी यंत्रणा बनविता येते. हे युनिट बनविण्यासाठी केंद्र शासनाकडून ग्राहकांना ४० टक्के अनुदान देण्यात येते. ३ किलो वॅटपेक्षा जास्त उर्जा निर्मिती करणारे युनिट बसविले जाणार असेल तर मात्र २० टक्केच अनुदान दिले जाते.

### ३ वर्षात पैसे वसूल

दरमहा वीजबिलातील आर्थिक बचतीमुळे उर्जा उभारणीच्या खर्चाची रक्कम ३ वर्षात वसूल होणार आहे. पर्यावरणप्रेमी ग्राहकांना गच्चीवरील वीज सौरउर्जा योजनेचा फायदा होत आहे. ग्राहकांना केंद्र शासनाकडून ४० टक्के अनुदान प्राप्त होत असल्याचे ग्राहकांचा कल सौरउर्जा लावण्याकडे वाढत आहे.

### ग्राहकांचा प्रतिसाद

घरगुती ग्राहकांना घरच्या छतांवर सौरउर्जा युनिट बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून अनुदान देण्यात येते. घराच्या गच्चीवर सौरउर्जा निर्मिती युनिट बसवून १ ते ३ किलो वॅट उर्जानिर्मिती करणारी यंत्रणा बसविणे शक्य आहे. पर्यावरणप्रेमी ग्राहकांचा याकडे कल वाहू लागला असून जास्तीत–जास्त नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा. बी.ए.वासनिक,

**मुख्य अभियंता महावितरण गोंदिया**

# वनविभागात रखडली विकासकामे



**नागपूर–रायपूर तिसरे रेल्वे लाईन**

**गोंदिया:** केंद्र सरकार आणि रेल्वेच्या देशभरात सुरु असलेल्या महत्वाकांक्षी तिसऱ्या मार्गिकेच्या प्रकल्पांतर्गत दक्षिण–पूर्व–मध्य रेल्वे झोनमध्ये समाविष्ट असलेल्या नागपूर–रायपूर तिसऱ्या मार्गिकेचे काम सालेकसा आणि दरेकसा स्थानकांदरम्यान थांबविण्यात आले आहे. एसईसीआर नागपूर विभागांतर्गत या दोन स्थानकांमधील अंतर ११.२० किमी आहे. विशेषत: या विभागात केवळ २५० मीटर पॅचमध्येच बांधकाम करायचे आहे. परंतु राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडून परवानगी दिली जात नाही.हा पॅच तयार झाल्यास भंडारा ते दुर्ग अशी १०२ किलोमीटरची संपूर्ण लाईन उपलब्ध होणार आहे. नागपूर ते तिरोडा आणि तुमसर आणि भंडारा रोडपर्यंत ६८ किमीचा ट्रॅक आधीच टाकण्यात आला आहे.

**६ महिन्यात एकही बैठक नाही**

मिळालेल्या माहितीनुसार, एसईसीआरने दोन्ही वन मंडळामध्ये २५० मीटरच्या या विभागात बांधकाम करण्यासाठी लेखी अर्ज करुन परवानगी मागितली आहे. मात्र, अद्याप परवानगी मिळालेली नाही. गत वर्षभरात एकही बैठक झालेली नाही. अशा स्थितीत मंजुरीची प्रकिया लांबलेली दिसते. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सालेकसा स्थानकापासून ७.५० किलोमीटरचा ट्रॅक टाकण्यात आला आहे. त्याचबरोबर नागपूर ते तिरोडा, तुमसर, भंडारा रोड अशी ६८ किलोमीटरची लाईनही टाकण्यात आली आहे. अशा स्थितीत भंडारा किल्ल्याशी जोडण्यासाठी केवळ २५० मीटरचा हा पॅच परवानगीत अडकला आहे. तसे झाल्यास १०२ किमीचा तिसरा सरळ मार्ग पूर्ण होईल.

**१०० वर्षे जुन्या बोगद्यात दरड**

नागपूर ते रायपूर दरम्यान बांधला जाणारा हा तिसरा रेल्वे मार्ग सुमारे १०० वर्षापुर्वी बांधलेल्या हावडा रेल्वे मार्गाला जोडून बांधला जात आहे. या मार्गावर अनेक जुने पूल आणि बोपदे बांधण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, नवीन रुळ टाकण्यासाठी डोंगर कापण्याची गरज आहे. मात्र स्फोटामुळे सुमारे १०० वर्षे जुन्या बोगद्यात भेगा पडल्या आहेत. अशा परिस्थितीत राष्ट्रीय वन्यजीव मंडळ आणि राज्य वन्यजीव मंडळाकडून परवानगी देण्यास नकार देत आहेत.

# जिल्ह्यात चार वर्षात वीज पडून २९ जणांचा मृत्यू

**गोंदिया:**–वीज पडून मृत्यू होण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून आले आहे. २०१८ ते ३० एप्रिल २०२२ या कालावधीत जिल्ह्यात वीज पडून झालेल्या घटनांमध्ये २९ जणांना प्राणास मुकावे लागले आहे. मागील आठवड्यात जिल्ह्यात वीज पडून ३ जणांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या.या पार्श्वभूमीवर वीज पडून होणारे मृत्यू चिंतेचा विषय ठरत आहेत.



देशात दरवषी २ हजारांपेक्षा जास्त लोक वीज पडून मृत्युमुखी पडतात. मे ते जुलै या काळात विजांचे प्रमाण सर्वाधिक आहे. लोकसंख्येची घनता, साक्षरता, शहरीकरण आणि विजांची घनता हे वीज पडून मृत्यू होण्यामागील काही महत्त्वाचे घटक आहेत. राज्यात मराठवाड्यामध्ये वीज पडून मृत्यू होण्याच्या घटना सर्वाधिक होतात. दहा हजार चौरस किलोमीटर परिसराचा विचार केल्यास मराठवाड्यामध्ये दहापेक्षा जास्त, त्या खालोखाल विदर्भात जवळपास दहा आणि उर्वरित महाराष्ट्रात जवळपास चार मृत्यू होत असल्याचे दिसून आले आहे. त्यातही मराठवाडयामध्ये जंगलाचे प्रमाण कमी असल्याने या भागात वीज पडण्याचे प्रमाण अधिक आहे. शेतात किंवा घराबाहेर असताना वीज पडून मृत्यू होण्याचे प्रमाण जवळपास ८६ टक्के आहे, तर ६ टक्के मृत्यू घरात असताना, ८ टक्के मृत्यू अन्य ठिकाणी असताना झाल्याची नोंद आहे. गोंदिया जिल्ह्यात सन २०१७–१८ ते आजपर्यंत वीज पडून २९ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यात मागील

**तीन महिन्यांच्या कालावधीत सहा जणांचा मृत्यू**

सन २०१७–१८ मध्ये १०, २०१८–१९ मध्ये १, २०१९–२० मध्ये २, २०२०–२१ मध्ये ९,२०२१–२२ मध्ये ७ अशा २९ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने केली आहे.

**अशी घ्या काळजी..**

वीज चमकत असताना घराबाहेर पडू नये, घरातील पृष्ठभाग आणि भिंती कोरडया राहतील याची दक्षता घ्यावी, बाहेर असताना उभे न राहता जमिनीवर बसावे, आडवे व्हावे, झाडाखाली उभे राहू नये किंवा बसू नये, केंद्र सरकारने तयार केलेले द्गदामिनीफ हे मोबाइल अ‍ॅप डाऊनलोड केल्यास विजांबाबतची पूर्वकल्पना मिळू शकते.

# जिल्ह्यात ३१५ ३१५ गावे दारुबंदीच्या मार्गावर

**गोंदिया:**– दारुच्या बाटलीमुळे अनेक संसार उद्ध्वस्त झालेत. अनेक संसार तुटण्याच्या मार्गावर असल्याचे पाहून जिल्ह्यातील महिला बचत गट व महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीच्या पुढाकाराने जिल्ह्यातील २४१ गावात दारुबंदी झाली. तर ३१५ गावे दारुबंदीच्या मार्गावर आहेत. दारुपायी अनेक घरे भंगली आहेत. गावातील ही विदारक परिस्थिती पाहून गावाचे चित्र पालटण्यासाठी महिला महत्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे गावातील महिलांना हाताशी घेऊन महात्मा गांधी तंटामुक्त गाव समित्यांनी गावागावात दारुबंदीसाठी पुढाकार घेतला आहे. मात्र काही राजकारणी व गुंडांनी त्याना दडपण्याचा प्रयत्न केला. तर काही ठिकाणी दारुबंदीसाठी पोलिस सहकार्य मिळत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. असे असतानाही आतापर्यतर्य २४१ गावांमध्ये दारुबंदी झाली आहेत, तर ३१५ गावे दारुबंदीच्या मार्गावर आहे. यासोबत बचत गटाच्या महिला व तंटामुक्त समितीने दारुबंदीसोबतच गावागावात चालणाऱ्या सट्टा, जुगार व इतर अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी कंबर कसली आहे.

# जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा–इंजि.यशवंत गणविर

**अर्जुनी मोरगाव:** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र गोठणगाव येथे जन आरोग्य समितीची आढावा बैठक जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष व आरोग्य सभापती इंजि.यशवंत गणविर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सदर बैठकीत प्राथमिक आरोग्य केंद्र गोठणगावचे वार्षिक नियोजन, केंद्रातील समस्या, औषधांचा साठा व वापर अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.




यावेळी इंजि.गणविर यांनी आरोग्य सेवा सर्वजनतेला उपलब्ध करुन देण्यासाठी आपले प्रयत्न सवीतोपरी राहणार असल्याचे सांगत जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा असल्याचे म्हटले.

सदर बैठकीला तालुका वैद्यकिय अधिकारी डॉ.विजय राऊत, डॉ.सुरेंद्र खोब्रागडे, जि.प. सदस्या कविता कापगते, पं.स. सदस्या आम्रपाली डोंगरावर, ग्रा.प. सदस्या हर्षाताई राउत, पं.स. उपसभापती होमराज पुस्तोडे, अशोक सरकार, जयंत राऊत, अशोक कापगते, रतिराम राणे, रविंद्र घरतकर, विनोद किरसान, कृष्णा मांडवे, संजय ईश्वार, तुलशिदास कोडापे तथा समीतीचे सर्व सदस्य व आरोग्य केंद्र गोठणगावचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुरेंद्र खोब्रागडे,संचालन एस.आर. पारधी व आभार प्रदर्शन डॉ.मडावी यांनी केले.

# मॉडेल कॉन्व्हेंट व महाविद्यालयात शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात

**गोरेगाव:**– स्थानीय मॉडेल कॉन्व्हेंट एन्ड विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय गोरेगाव येथे ०३ जुलै रोजी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडले.या प्रशिक्षण कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री तुलसी शिक्षण संस्थेचे सचिव प्रा.आर.डी.कटरे होते.



यावेळी प्राचार्य सौ.सी.पी.मेश्राम, संस्था अध्यक्ष सौ.एस.आर.कटरे, प्रशिक्षक विमलताई विद्यालयाचे प्राचार्य मनोज रहांगडाले,शहिद जान्या तिम्या विद्यालयाचे शिक्षक एस.बी.कटरे उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना प्राचार्य मनोज रहांगडाले यांनी प्रशिक्षणातून शिक्षकांना विध्यार्थ्यांना कसे घडविता येईल यासोबतच नवीन शिक्षण प्रणालीवर शिक्षकांना मार्गदर्शन केले. विध्यार्थ्यांना घडवितांना त्यांना शिकवलेल्या भागावर पूर्वज्ञान जागृत करणे. मुलांचे मेंदू हे जन्मजातच विकसित होत असते आपल्याला फक्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन करावे. त्याचप्रमाणे वर्गामध्ये शिकविताना विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देऊन शिकवावे असे सांगितले.

दुसर्या सत्रात एस.बी.कटरे यांनी विध्यार्थ्यांना इंग्रजी भाषेत संभाषण कसे करता येईल तसेच शिक्षक म्हणून आपण त्यांना कश्याप्रकारे शिक्षण देऊ शकतो यावर मारदर्शन केले. तसेच विध्यार्थ्यांच्या मनामध्ये असलेली इंग्रजी भाषेची भिती कमी करण्यासोबतच अंधश्रद्धा निर्मूलन तसेच सामाजिक जाणिव विध्यार्थ्यांमध्ये रुजविणे आवश्यक असल्याचे सांगितले.

विद्यार्थ्यांसोंबत अधिकाधिक इंग्रजित संभाषण केल्यास त्यांच्या मनातील भिती दूर होऊ शकते असेही ते म्हणाले. तिसऱ्या सत्रात शाळेचे संस्थापक आर.डी.कटरे यांनी सुसंस्कृत विद्याथी घडविण्यासाठी प्रशिक्षकांनी दिलेल्या मुल्यांच्या वापर करण्याचा सल्ला दिला. संचालन कु.एस.डी. चिचामे व कु.एन.के. ठाकूर यांनी आभार मानले.

# मंगळवारी जिल्ह्यात सात रुग्ण डिस्चार्ज

**गोंदिया :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून ५ जुलै रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवीन एकही कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आलेला नाही. तर डिस्चार्ज रुग्णांची संख्या ७ आहे. आजपर्यंत ४६,२६७ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले. ४५,५२८ रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली.

क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या १७ आहे. क्रियाशील असलेले १५ बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहेत तर २ बाधित रुग्ण भरती आहेत. आतापर्यंत जिल्ह्यातील ५८८ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९८.४० टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.२७ टक्के आहे तर डब्लिंग रेट ५५१.५ दिवस आहे.

# ग्रामसेवक युनियन जिल्हा वार्षिक अधिवेशन व पतसंस्थेची आमसभा उत्साहात




**गोंदिया:** जिल्हा परिषद ग्रामसेवक सहकारी पतसंस्था र. नंबर ११६ चि पाचवी आमसभा व गोंदिया जिल्हा ग्रामसेवक युनियन चे वार्षिक अधिवेशन मयूर लॉन कटंगी कला येथे मुख्य अतिथी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील व उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत खामकर, युनियन मानद अध्यक्ष कार्तिक चव्हाण यांचे प्रमुख उपस्थितीत जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर सभेला जिल्ह्यातील सर्व ग्राम विकास अधिकारी व ग्रामसेवक उपस्थित होते.

ग्राम पंचायत पातळीवर नियमबाह्य कामे होऊ देऊ नये शासनाचा पैशाचा विनियोग केवळ नाली रस्ते बांधकाम पुरते मर्यादित न ठेवता मानवी विकास निर्देशांक वाढण्याच्या दृष्टीने आवश्यक बाबींवर खर्च करायला हवा. त्या पैश्याचा वापरातून केलेली विकास कामे लोकांच्या उपयोगी पडायला हवी असे उदगार मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी यावेळी काढले.

सादर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कमलेश बिसेन जिल्हाध्यक्ष यांनी केले तर संचालन कुलदीप कापगते जिल्हा सचिव, आमसभा संचालन भावेश चव्हाण संस्था यांनी केले तर आभार संस्था उपाध्यक्ष दयानंद फटिंग यांनी केले. सदर कार्यक्रम ला सचिन कुथे उपाध्यक्ष, भारती वाघमारे महिला उपाध्यक्ष, शैलेश परिहार कोषाध्यक्ष, योगेश रुद्रकर सहसचिव, वाय. एच. बिसेन, रजनी सहारे राज्य कौंसिलर, आर. आर. जमाईवार प्रसिद्धी प्रमुख, रितेश सहारे, संघटक, सुरेश वाघमारे, टीकाराम जणबंधू,जिल्हा संघटक, कायदे सल्लागार पी. जी. ठाकरे, किशोर आचके, नरेंद्र गोमासे, नम्रता रंगारी तसेच संचालक नरेंद्र अतकरी, निशा टेंभरे, ज्योती बिसेन, रविंद्र अंबाडे, सुनील पटले, सुरेंद्र निघोट, तारेश कुबळे, ओ. जी. बिसेन, सिंधु सूर्यवंशी व जिल्ह्यातील सर्व ग्रामसेवक ग्राम विकास अधिकारी उपस्थित होते.

# डासांची उत्पत्ती रोखा आणि डेंग्यूला दूर हटवा



## आरोग्य विभागाचे आवाहन

**गोंदिया:** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस होण्याची शक्यता असून डबके, पाणी साचण्याच्या जागेत डासांची उत्पत्ती होते. यामुळे नागरिकांनी परिसर स्वच्छता, कोरडा दिवस पाळणे आणि घराजवळ पाणी साचण्याच्या जागा नष्ट कराव्यात, जेणेकरून डासांची उत्पत्ती होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी केले आहे.

आरोग्य विभाग, जिल्हा हिवताप विभाग आणि नगरपरिषद प्रशासन डेंग्यू होऊ नये, यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. एडीस एजिप्ती डासाची उत्पती साठवलेल्या स्वच्छ पाण्यात होत असल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांच्या गृहभेटीमध्ये प्रत्येक गावात घरांना भेटी देऊन कीटकशास्त्रीय सर्वेक्षण केले जात्त आहे. प्रत्येक घरातील वापरण्यासाठी भरण्यात येणारे पाणी साठे तपासले जात आहेत. पाणीसाठ्यात डेंग्यू डासाच्या अळ्या आढळून आल्यास तो भांडी रिकामी करावी लागतात. रिकामे करता न येणाऱ्या पाणी साठ्यामध्ये टेमिफॉस किंवा बेटचे द्रावण टाकण्यात यावे अशी माहिती डॉ. वानखेडे यांनी दिली.

डॉ. वानखेडे यांनी डेंग्यूबाबत दिलेली माहिती पुढीलप्रमाणे, डेंग्यू हा एक विषाणूमुळे होणारा आजार आहे. या विषाणूंचे चार उपप्रकार आहेत. एडिस इजिप्ती व एडिस अलेबोपिक्टस या डासांच्या चाव्यामुळे हा रोग पसरतो. संक्रमणात्मक डासाच्या चाव्यानंतर पाच–सहा दिवसानंतर मनुष्याला आजार होतो. डेंग्यू हा सामान्यतः आपोआप बरा होणारा रोग आहे. बहुतांश रुग्ण बरे होतात. डेंग्यू ताप, डेंग्यू रक्तसावी ताप, डेंग्यू शॉक सिंड्रोम अशा तीन प्रकारे होवु शकतो. डेंग्यू रक्तस्रावात्मक ताप अधिक तिव्र स्वरुपाचा आजार असुन यामुळे मृत्यू ओढवू शकतो.

**डेंग्यू ताप–** लहान मुलांमध्ये मुख्यतः सौम्य स्वरूपाचा ताप येतो. मोठ्या माणसांमध्ये अधिक तीव्रतेचा ताप असतो. सोबत डोके डोळे दुखणे, अंगदुखी, अशक्तपणा, चव आणि भूक न लागणे, मळमळणे, उलट्या, अंगावर लाल रंगाचा चट्टा येऊ शकतो. अंगदुखी तीव्र स्वस्त्रात असू शकते म्हणून याला हाडे मोडणारा ताप असेही म्हणतात.



**डेंग्यू रक्तस्रावात्मक ताप–** हा गंभीर स्वरूपाचा प्रकार असून यात तापाबरोबरच बाह्य रक्तसाव चट्टे उठणे, हिरड्यांमधून रक्तसाव, अंतर्गत रक्तसाव, आतड्यांमधून रक्तस्राव, प्लेटलेट्सची संख्या कमी होणे, रक्तासह किंवा रक्ताविना वारंवार उलट्या होणे, श्वास घेताना त्रास इत्यादी प्रकार होऊ शकतात. तसेच छातीत, पोटामध्ये पाणी जमा होऊ शकते. बाकी लक्षणे डेंग्यू तापाप्रमाणेच असतात.

**डेंग्यू शॉक सिंड्रोम–** ही डेंग्यू रक्तस्त्राराच्या तापाचीच पुढची अवस्था असून काही टक्के लोकांमध्येच हि दिसून येते. यात रुग्णाचे अस्वस्थ होणे, थंड पडणे, नाडी मंदावणे किंवा अती जलद होणे, रक्तदाब कमी होणे आणि शेवटी मृत्यू ओढवू शकतो.

**उपचार–** डेंग्यु विषाण्युजन्य आजार असल्याने विशिष्ट औषधोपचार नाहीत, मात्र लक्षणे आणि चिन्हानुसार औषधे दिली जातात. ताप आणि अंगदुखी कमी करण्यासाठी वेदनाशामक पॅरासिटीमॉल औषध गुणकारी आहे. स्पिरीन, ब्रुफेन, स्टिरॉइडस, प्रतिजैविके औषधे वापरू नयेत. रुग्णाच्या शरीरातील पाणी, रक्ताचे प्रमाण कमी झाल्यास शिरेवाटे काढून अथवा प्लेटलेटस देणे गरजेचे असते. दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रकारातील रुग्णाला तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली त्वरित उपचार द्यावे लागतात..

### डासांच्या आजारापासून असे राहा दूर

- ✻ आठवड्यातून एक दिवस सर्वांनी कोरडा दिवस पाळावा.
- ✻ घरासमोर पाणी साचू देऊ नका, घर व परिसर स्वच्छ ठेवा.
- ✻ पाण्याचे टँक तथा बैरेल स्वच्छ ठेवा, टँक उघडे ठेवू नका.
- ✻ सायंकाळी दरवाजे, खिडक्या बंद करून ठेवाव्यात; खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात.
- ✻ झाडांच्या कुंड्यांत पाणी साचू देऊ नका; त्या ठिकाणी स्वच्छता ठेवा.
- ✻ घरातील फ्रिज, कुलरमधील पाणी वारंवार बदलावे.

डेंग्यू कसा ओळखाल

- ✻ सर्दी, ताप आणि वारंवार खोकला येतो.
- ✻ अंगावर लहान–लहान पुरळ येतात.
- ✻ जेवल्यावर अथवा जेवण केलेले नसतानाही उलट्या अन मळमळ होते.
- ✻ रक्तातील प्लेटलेट्स कमी होऊन अशक्तपणा जाणवतो.
- ✻ घरासमोर झाडे लावल्यानंतर नागरिकांनी त्या कुंड्यांत पाणी साचू देऊ नये. डासांच्या बहुतेक अळ्या त्याच ठिकाणी आढळतात. आरोग्य विभागातर्फे उपाययोजना सुरू आहेत, परंतु नागरिकांनी खबरदारी म्हणून घर व परिसर स्वच्छ ठेवावा. पाणी उघडे ठेवू नये, असे आवाहन डॉ. वानखेडे यांनी केले आहे.

डेंग्यु ला रोखणे हे केवळ आरोग्य विभागाचे काम नसून त्यासोबत इतर विभाग जसे शिक्षण, बांधकाम, ग्रामपंचायत, महिला व बालकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, नगरपरिषद/ पंचायत, विविध पदाधिकारी, राजकीय पदाधिकारी, प्रतिभावंत, समाज–सेवक या सर्वांनी एकत्रितपणे काम केल्यास निश्चितच डेंग्यु वर नियंत्रण मिळवु शकतो. जिल्ह्यात सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, आशा सेविका आपल्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना स्वतः व लोकांकडून करीत आहेत. जिल्ह्यात श्री.प्रशांत खरात जिल्हा आय.ई.सी. अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक आरोग्य संस्थेत डेंग्यू प्रतिबंधात्मक बॅनर वितरित करण्यात आलेली असून व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. पण गरज आहे ती लोकसहभागाची. स्वतः लोकांनी जागृत झाल्यास नक्कीच डेंग्यु वर नियंत्रण मिळवता येत असल्याचे प्रतिपादन डॉक्टर वानखेडे यांनी केले आहे.


## ग्रामपंचायत कार्यालय कावराबांध पंचायत समिती सालेकसा

### ई-टेंडर नोटीस क्र.१-२०२२-२३

ग्रामपंचायत कावराबांध येथे सन २०२२–२३ या आर्थिक वर्षाकरिता विविध योजना करीता लागणारे साहित्य पुरविण्याकरीता विक्रीवर कायद्यान्वये पंजीकृत पुरवठा धारकांकडून ई–निविदा (दोन लिफाफा पद्धतीने) मागविण्यात येत आहेत. सदर कामाची प्रक्रिया संगणकावर ऑनलाईन प्रक्रियेद्वारे करण्यात येईल. निविदे संबंधित या पुढील सर्व सुचना/शुद्धी पत्रक इत्यादी विषयी संपूर्ण माहिती शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर पाहता येईल व डाऊनलोड करुन निविदा भरता येईल. ई–निविदा प्रसिद्धी दि.३०/०६/२०२२, ई–निविदा अंतिम दि.०८/०७/२०२२ व उघडण्याची दि.११/०७/२०२२ सकाळी १०.०० वाजता तसेच वरील निविदा विषयी सविस्तर माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**सरपंच** ग्रामपंचायत कावराबांध

**ग्रामविकास अधिकारी** ग्रामपंचायत कावराबांध

## विधानसभेच्या अध्यक्षपदी ॲड.राहुल नार्वेकर यांची निवड



**मुंबई:** – विधानसभेच्या अध्यक्षपदी ॲड. राहुल सुरेश नार्वेकर यांची निवड झाल्याचे विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी जाहीर केले. श्री.नार्वेकर यांच्या बाजूने एकूण १६४ सदस्यांनी मतदान केले.

राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशन ३ आणि ४ जुलै २०२२ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात आज अध्यक्षपदासाठी निवडणूक घेण्यात आली. या पदासाठी ॲड. राहुल सुरेश नार्वेकर आणि राजन प्रभाकर साळवी या सदस्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. यानंतर झालेल्या निवडणुकीत राहुल नार्वेकर यांना १६४ मते मिळाल्याने त्यांची अध्यक्षपदी निवड झाल्याचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी जाहीर केले. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सदस्य अजित पवार, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, नाना पटोले यांच्यासह सभागृहातील ज्येष्ठ सदस्यांनी ?ड नार्वेकर यांना अध्यक्षांच्या आसनावर नेऊन स्थानापन्न केले.

# शिंदे सरकारमध्ये गोंदियाला प्रतिनिधीत्व मिळणार का?

**गोंदिया:–** राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळल्यांतर जिल्ह्यातील एकमेव निवडून आलेले भाजपचे तिरोडा–गोरेगावविधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले व भाजपचे बंडखोर म्हणून अपक्ष निवडणूक लढविलेले गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल, डॉ.परिणय फुके यांना नवीन शिंदे फडणवीस सरकार मंत्रिपदाचा ङ्मपॉवरफ देणार का? याकडे जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

भाजप नेते देवेंद्र फडणवीस याचे सहकारी म्हणून आ. विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले व परिणय फुके यांच्याकडे पाहिले जाते. ते गोंदियाजिल्ह्यातील तिरोडा–गोरेगाव विधानसभा क्षेत्रातील रहांगडाले हे भाजपाचे एकमेव आमदार आहेत. ते दुसऱ्यांदा या विधानसभा क्षेत्रातून नेतृत्वकरीत आहेत. विधानसभा निवडणूक २०१९ चे निकाल हाती आल्यानंतर राज्यात युतीचे सरकार स्थापन होईल आणि जिल्ह्याला मंत्रिमंडळात स्थान व पालकत्वही मिळेल, अशी अपेक्षा जिल्हावासी बाळगून होते. ते परंतु त्यानंतर राज्यात शिवसेना–राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसचे महाविकास आघाडी सरकार आल्याने रहांगडाले व फुके समर्थक नाराज झाले होते. ते परंतु आता राज्यात पुन्हा एकदा भाजप आणि शिंदे फडणवीसचे सरकार आल्याने आ. अग्रवाल, रहांगडाले व फुके समर्थकांना मंत्रीपदाची आस लागली आहे.



२०१४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये राज्यात भाजप युतीचे शासन स्थापन झाले आणि जिल्ह्याला राजकुमार बडोले यांच्या रुपयाने मंत्रीपदमिळाले. तेचते गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री झाले. यानंतर मंत्रिमंडळ विस्तारात विधान परिषद सदस्य डॉ. परिणय फुके यांना राज्यमंत्रीपददेण्यात आले. यावेळी त्यांनी जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले.

यानंतर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप युतीला जनतेने कोल दिलाअसला तरी अभद्र युती मुळे राज्यात भाजप युतीचे सरकार स्थापन होऊ शकले नाही आणि जिल्ह्यात महाविकास आघाडीचे दोन आमदार असूनही मंत्रिमंडळात कुणालाही प्रतिनिधित्व मिळाले नव्हते. पुन्हा एकदा जिल्हा पालकत्वामुळे पोरका राहिला आणि आयातीचे पालकमंत्री याजिल्ह्याने पाहिले. दरम्यान जिल्ह्याचे पालकमंत्री असलेले अनिल देशमुख यांनी केलेल्या गैरप्रकारामुळे त्यांचे मंत्रीपद गेले. यानंतर आलेले नवाब मलिक यांनाही घोटाळ्यामुळे जेरबंद व्हावे लागले. नंतर प्राजक्त तनपुरे यांना जिल्ह्याचे पालकत्व देण्यात आले. अडीच वर्षाच्या कालावधीत जिल्ह्याला तीन पालकमंत्री मिळाले.

यादरम्यान जिल्ह्यात विविध विकास कामांना ब्रेक लागला. आता राज्यात भाजप आणि शिंदे गटाची सत्ता स्थापन झाल्याने जिल्हावाशियांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. जिल्ह्यात भाजपचे एकमेव आमदार विजय रहांगडालेनेतृत्व करीत आहेत तर गोंदियाचे भाजपचे बंडखोर अपक्ष आमदार विनोद अग्रवाल यांनी देखील जाहीररित्या भाजपाला समर्थन दिले आहे. आता नव्याने शिंदे–फडणवीस सरकार राज्यात कारभार पाहणार असून अग्रवाल, रहांगडाले व फुके यांना मंत्रीपद मिळते का? हे पाहावं लागणार आहे. डॉ.परिणय फुके यांच्याकडेही जिल्ह्याचे भावी पालकमंत्री म्हणून पाहिले जात आहे. कारण त्यांनी यापूर्वी जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले आहे. काहीही असो परंतु शिंदे–फडणवीस सरकारमध्ये जिल्ह्याला प्रतिनिधित्व मिळावे अशी जिल्हावाशियांची अपेक्षा आहे.

## आतापर्यंतचे विधानसभा अध्यक्ष

| क्रम | निवडणूक वर्ष | विधानसभा अध्यक्ष |
|---|---|---|
| पहिली विधानसभा | १९६० | सयाजी सिलम |
| दुसरी विधानसभा | १९६२ | त्र्यंबक शिवराम भारदे |
| तिसरी विधानसभा | १९६७ | त्र्यंबक शिवराम भारदे |
| चौथी विधानसभा | १९७२ | एस.के. वानखेडे |
| पाचवी विधानसभा | १९७८ | शिवराज पाटील |
| | राष्ट्रपती राजवट | |
| सहावी विधानसभा | १९८० | शरद दिघे |
| सातवी विधानसभा | १९८५ | शंकरराव जगताप |
| आठवी विधानसभा | १९९० | मधुकरराव चौधरी |
| नववी विधानसभा | १९९५ | दत्ताजी नलावडे |
| दहावी विधानसभा | १९९९ | अरुण गुजराथी |
| अकरावी विधानसभा | २००४ | बाबासाहेब कुपेकर |
| बारावी विधानसभा | २००९ | दिलीप वळसे–पाटील |
| तेरावी विधानसभा | २०१४ | हरिभाऊ बागडे |
| चोदावी विधानसभा | २०१९ | नाना पटोले (राजीनामा) |
| | | हंगामी अध्यक्ष नरहरी झिरवळ |
| चोदावी विधानसभा | २०२२ | राहूल नार्वेकर |

## भरपावसात निघाला अंगणवाडी सेविकांचा जि.प.वर मोर्चा

**गोंदिया:–** महाराष्ट्र राज्य आंगणवाडी बालवाडी कर्मचारी यूनियन आयटक गोंदिया जिल्हा शाखेच्यावतीने ४ जुलैरोजी भर पावसात विविध मागण्यांना घेऊन जिल्हा परिषद कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला.



अंगणवाडी सेविकांना शासकीय कर्मचारी दर्जा देण्यासोबतच २१ हजार रुपये मासिक मानधन देण्यात यावे. वैद्यकीय रजा मंजूर करण्यात यावे.सेवानिवृत्त सेविका व सहाय्यिकांना एकरक्कमी थकीत रक्कम देण्यात यावे. पोषण आहार ट्रक मराठी भाषेत करुन नवे मोबाईल देण्यात यावे आदी मागण्यासांठी हा मोर्चा आयटकचे प्रदेश उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले, अंगणवाडी सेविका संघटन जिल्हाध्यक्ष शंकुतला फटिंग, आम्रकला डोंगरे, जिवनकला वैद्य, पौर्णिमा चुटे, विठाबाई पवार, बिरजूला तिडके व कांचन लाडे यांच्या नेतृत्वात काढण्यात आला.

मोर्चा जिल्हापरिषदेसमोर पोचल्यानंतर महिला व बालविकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर तसेच उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपात्रे यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावे असलेले निवेदन सादर करण्यात आले.

निवेदन देतेवेळी सुनिता मंलगा, मिनाक्षी पटले, राजलक्ष्मी हरिनखेडे, लालेश्वरी शरणागत, अर्चना मेश्राम, देवगंणा अंबुले, अर्चना मेश्राम, प्रणिता रंगारी उपस्थित होते.

## 'त्या' मृत कर्मचाऱ्याच्या मुलीला कामावर घेण्यास टाळाटाळ

**अर्जुनी मोरगाव:** तालुक्यातील पिंपळगाव /खांबी येथील ग्राम पंचायतमध्ये सन २००५ पासून सन २०२१ पर्यंत कार्यरत असलेले कर्मचारी भाऊराव केवळराम वलथरे यांचे आकस्मिक मृत्यू झाला. भाऊराव हा कुटूंबात कमावता व्यक्ती होता. त्यामुळे वलथरे कुटूंबावर आर्थिक संकट कोसळले. वारसान हक्क व सामाजिकता जोपासून ग्राम पंचायत प्रशासनाकडून त्याच्या मुलीला कामावर घेणे गरजेचे आहे. मात्र, ग्राम पंचायतचे पदाधिकारी जाणीवपूर्वक कामावर घेण्यास टाळाटाळ करीत आहेत. असा आरोप उत्कर्षा वलथरे हिने केले आहे. न्याय न मिळाल्यास ५ जुलैपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा तिने दिला आहे.

पिंपळगाव/खांबी येथील ग्राम पंचायतमध्ये भाऊराव वलथरे हा १ मे २००५ पासून ते ३ एप्रिल २०२१ पर्यंत ग्रामीण पाणीपुरवठा कर्मचारी म्हणून कार्यरत होते. ते ४ जून २०२१ ला मरण पावले. नियमानुसार विंष्ठबहुना सामाजिकता जोपासत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याच्या कुटूंबातील एखाद्या व्यक्तीला कामावर घेणे गरजेचे असते. त्यानुरूप वलथरे यांची मुलगी उत्कर्षा ही योग्य आहे. या अनुसंगाने उत्कर्षाने ग्राम पंचायतीकडे अर्ज देखील केले होते. मात्र, १८ वर्ष पूर्ण व्हायचे आहे, असे सांगून ग्राम पंचायत प्रशासनाकडून तिचे अर्ज स्विकारण्यात आले नाही. सहा महिन्यानंतर १८ वर्ष पूर्ण झाल्याने तिने पुन्हा अर्ज केले. मात्र, तिच्या ऐवजी इतर दुसठयाला नियुक्ती देण्यात आली आहे.

एंकदरीत या प्रकरणात सरपंच इतर पदाधिकारी जाणीवपूर्वक उत्कर्षाला कामावर घेण्यास टाळाटाळ करीत आहेत. या अन्यायाला त्रासून उत्कर्षाने ५ जुलैपासून पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याची भुमिका स्विकारली आहे. या संदर्भात वरिष्ठांकडे निवेदनही करण्यात आले आहे. वरिष्ठ कार्यालयाकडून या प्रकाराची दखल घेवून उत्कर्षाला न्याय मिळणार काय? याकडे लक्ष लागले आहे.

## ९० तलाव लिलावातून मिळाले ५ लाखाचे महसूल

**गोंदिया:–** गेल्या दोन वर्षापासून कोरोनासंसर्गामुळे जिल्हा परिषदेच्या मालकीचे असलेल्या तलावांचे लिलाव न झाल्याने मत्स्यव्यवसायिकांना अडचणीचा सामना करावा लागला होता. मात्र आता कोरोना संसर्ग संपुष्ठात आल्याने यावर्षी गोंदिया पंचायत समिती कार्यालयातंर्गत येत असलेल्या तालुक्यातील ९० तलावांचे जाहिर लिलाव पंचायत समितीच्या सभागृहात नुकतेच करण्यात आले.

या लिलावातून सुमार ५.५० लाखाचा महसुल जिल्हा परिषदेच्या शासकीय तिजोरीत गोळा झाला आहे. पंचायत समितीचे सभापती मुनेश रहांगडाले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या लिलावाला गटविकास अधिकारी राजकुमार पुराम, उपसभापती निरज उपवंशी, विस्तार अधिकारी संगिता अग्रवाल उपस्थित होते.

सन २०१६ ते २०२१ पर्यंत कालावधीतील तलावांचे मत्स्यसंस्थाना कोरोना प्रादुर्भावामुळे लिलाव करण्यात आलेले नव्हते. त्यातच काही नविन तलावांचा समावेश झालेला होता. त्यासोबत २०१७ ते २२ हा कालावधी संपलेल्या जिल्हा परिषदेच्या तलावांचे लिलाव थांबलेले होते. त्या तलावांचे लिलाव पंचायत समितीच्या सभागृहात मत्स्य संस्थासोबत वाटाघाटीने व ठेका पद्धतीने करण्यात आले.सदर लिलावामुळे मत्स्य पालन सहकारी संस्थाना व्यवसायाकरीता प्रोत्साहन मिळाले आहे.



## सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना मिळणार विमा कवच मिळणार

**गोंदिया:–** शासन मागील अनेक वर्षांपासून आपल्या सेवेत कंत्राटी कर्मचारी सामावून घेत आहे. मात्र जिल्हा परिषद स्तरावर त्यांच्या अनेक समस्या प्रलंबित असतात. त्या समस्या तात्काळ मार्गी लावण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी केले. तसेच यानंतर सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना विमा पॉलिसी जिल्हा परिषदेच्या वतीने देण्यात येणार असे आश्वासन ही त्यांनी यावेळी दिले.



जिल्हा परिषदेच्या सभागृहात ३० जून रोजी जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सहविचार सभेचे आयोजन जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्या सूचनेनुसार सायंकाळी ४ वाजता करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या सभेला जिल्हा परिषद सदस्य सुरेश हर्षे तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन नरेश भांडारकर उपस्थित होते.

सुरुवातीला समग्र शिक्षा अभियान, एनआरएचएम, पाणी व स्वच्छता विभाग तसेच उमेद अभियानाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून असलेल्या विविध समस्या ऐकून घेतल्या. यावेळी कंत्राटी कर्मचाऱ्यांना कोणतेही विमा पॉलिसी नसल्याने कठीण प्रसंगात त्यांना व त्यांच्या नातेवाईकांना खूप त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांची विमा पॉलिसी जिल्हा परिषदेच्या निधीतून काढण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या या निर्णयाचे सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी स्वागत केले. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद स्तरावरील प्रलंबित समस्या तात्काळ मार्गी लावण्यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन यांना निर्देश दिले.

यानंतर कंत्राटी कर्मचारी समन्वय समिती गठीत करून दर तीन महिन्यांनी सभा आयोजित करण्याबाबत निर्देशीत केले. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या आकस्मिक मृत्यू झाल्यास त्यांनाही जिल्हा परिषदेच्या वतीने मदत राशी देण्यात यावी अशी मागणी कंत्राटी कर्मचाऱ्यांनी केली असता यासंबंधात जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत चर्चा करून निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वतीने समग्र शिक्षा अभियान चे दिलिप बघेले, विजय ठोकणे, आरोग्य विभागाचे बिसेन, पाणी व स्वच्छता विभागाच्या वतीने अतुल गजभिये यांनी समस्यांचा पाढा वाचला. सर्व समस्या निकाली काढण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन भागचंद्र रहांगडाले यांनी केले.

## आपत्ती व्यवस्थापन पथकाचे पांगडी जलाशयात पूर परिस्थिती सराव

**गोंदिया :** जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जलाशय नदी–नाले यांची पाण्याची पातळी झपाट्याने वाढली असून मान्सून कालावधीत केव्हाही पूर परिस्थिती उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नही. त्यामुळे पूर परिस्थितीला सक्षमपणे तोंड देण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गोंदिया तर्फे पूर परिस्थितीमध्ये शोध व बचाव कार्य करण्याकरिता प्रत्येक तालुक्यात जनजागृती कार्यक्रम घेण्यात येत आहे.

दिनांक ४ जुलै २०२२ रोजी जिल्हा शोध व बचाव पथकामार्फत गोंदिया येथील पांगडी जलाशयात पूरपरिस्थिती रंगीत तालीम व सराव करण्यात आले.

जिल्हा प्रशासनाकडून पूर परिस्थितीमध्ये जीवित व वित्तीय हानीचे प्रभाव कमी करण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गोंदिया मार्फत नियमित रंगीत तालीम व सराव करण्यात येत आहे.

पांगडी जलाशयात सराव दरम्यान शोध बचाव पथकाचे सदस्य नरेश उईके, राजकुमार खोटेले, जसवंत रहांगडाले, रविंद्र भांडारकर, संदीप कराडे, दिनू दिप, राजाराम गायकवाड, महेंद्र ताजने, दुर्गप्रसाद गगंगापारी, मनोज केवट (चालक) मंगेश डोये इत्यादी उपस्थित होते.



# राज्यात ५४५ शाळांमध्ये अटल टिंकरिंग

**औरंगाबाद :** शालेय जीवनापासूनच मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, अभियंत्यांप्रमाणे संकल्पना व गणितीय सूत्राधारित विचारशैली (स्टेम) विकसित करण्यासाठी आणि तंत्रज्ञानाविषयीची भीती घालवण्याच्या उद्देशाने केंद्राच्या नीती आयोगाअंतर्गत अटल टिंकरिंग प्रयोगशाळा सुरू करण्यात येत आहेत.

राज्यात ५४५ शाळांमध्ये या टिंकरिंग प्रयोगशाळांना मान्यता मिळालेली आहे. देशात सहा हजार ३८ अटल प्रयोगशाळांना मान्यता मिळालेली असून यामधील संख्येत महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे. सर्वाधिक उत्तरप्रदेश (७२९) तर त्या खालोखाल तामिळनाडू (७६१) व कर्नाटकला (५७९) प्रयोगशाळा मिळालेल्या आहेत. या प्रयोगशाळांमधून त्रिमितीय छपाई, कृत्रिम प्रज्ञातंत्रज्ञान (आर्टिफिशल इंटेलिजन्स), रोबोटिक, विज्ञानाधारित नवतंत्रज्ञानाशी विद्यार्थ्यांना अवगत करणे. स्टेम अर्थात सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनिअरिंग व मॅथ्सच्या माध्यमातून नवउद्यमी, कौशल्यज्ञान विकसित करण्याच्या दृष्टीने मदत करण्याचा उद्देश आहे. जपानमधील मुलांप्रमाणे स्वनिर्मित वस्तूंचा विचार रुजवण्यासाठी अटल टिंकरिंग प्रयोगशाळांचा उपयोग होणार आहे.

विशेष म्हणजे एखाद्या संस्थेला मान्यता मिळालेल्या प्रयोगशाळेत अन्य परिसरातील शाळांनाही भेट देता येणार आहे. या प्रयोगशाळेत विशिष्ट इयत्तेच्या मुलांना प्रवेश, असा काही नियम नाही, अशी माहिती अभ्यासकांकडून मिळाली. विद्यार्थ्यांमध्ये शालेय स्तरावरच तंत्रकौशल्य निर्माण व्हावे, या विचारातून अटल टिंकरिंग प्रयोगशाळेत इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, रोबोटिक्सची माहिती शिकवण्यात येणार आहे.

गर्दीतील नेमकी संख्या मोजण्यासारख्या तंत्रातून मुलांमध्ये विज्ञानाविषयीचे आकर्षण निर्माण करून तांत्रिक वस्तूंशी खेळताना नवसंकल्पना निर्माणाच्या दृष्टीने अटल टिंकरिंग प्रयोगशाळांचा उपयोग महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**राज्यातील प्रयोगशाळांची संख्या**

राज्यासाठी मंजूर झालेल्या ५४५ प्रयोगशाळांच्या संख्येपैकी निम्यांपर्यंत पुणे (३६), कोल्हापूर (६५), सांगली (४५), सातारा (४१), सोलापूर (१८) व अहमदनगर (४६) या जिल्ह्यांमध्ये आहेत. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी सर्वाधिक बीड (३६) जिल्ह्यात आहेत. त्याखालोखाल लातूर (२३), औरंगाबाद (९), जालना व नांदेड प्रत्येकी ४, परभणी ६, उस्मानाबाद ५ तर हिंगोलीला २ प्रयोगशाळा मंजूर झाल्या आहेत. पूर्व व पश्चिम विदर्भाला एकूण ९१ तर कोकणातील तीन जिल्ह्यांमध्ये २२, नाशिक (३४), जळगाव (८), धुळे (५), नंदूरबार (४), मुंबई शहर (९), उपनगर (६), ठाणे (१२) जिल्ह्याला प्रयोगशाळा मिळाल्या आहेत. दरम्यान, औरंगाबाद विभागातील काही शाळांमध्ये अटल टिंकरिंग प्रयोगशाळा सुरूकरण्यात आल्याची माहिती शिक्षण उपसंचालक अनिल साबळे यांनी दिली.

# शेतकरी हितासाठी २५ गोडाऊन तयार करणार

### जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले यांची घोषणा : जिल्हा परिषदेत कृषी दिन साजरा



**गोंदिया :** जिल्हयात धानाच्या शेतीवर भर आहे. धानाच्या शेतीतून कीती प्रगती होते, यावर चिंतन करण्याची गरज व्यक्त करून शेतकऱ्यांनी आता नगदी पिकांच्या उत्पादनवर भर द्यावा, असे आवाहन जिल्हा परिषद गोंदियाचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी केले. दरम्यान शेतकऱ्यांच्या हितासाठी जिल्हयात २५ गोडाऊन आणि मकोल्डस्टोरेजफ तयार करण्याचा मानसही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

कै. वसंतराव नाईक जिल्हा परिषद सभागृहात आयोजित कृषी दिन कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, उपाध्यक्ष इंजि. यशवंत गणवीर, कृषी व पशूसंवर्धन समितीचे सभापती सोनू कुथे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शितल पुंड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी जर्नादन खोटरे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी हिंदूराव चव्हाण, कृषी विकास अधिकारी मडामे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नरेश भांडारकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जी. आर. खामकर यावेळी उपस्थित होते.

**डॉक्टर हे उत्तम समाजसेवक : इंजि. यशवंत गणवीर**

**आधुनिक काळात व्यक्तींचे आर्युमान वाढले. कोणताही आजार असो, विज्ञानातील प्रगतीने त्यावर मात केली. केवळ व्यवसाय म्हणूनच नव्हे; तर उत्तम समाजसेवेचे व्रत म्हणून डॉक्टरांची सेवा अत्यंत महत्वाची असल्याचे मत जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंजि. यशवंत गणवीर यांनी व्यक्त केले. दरम्यान डॉक्टर्स दिनानिमीत्त सर्व डॉक्टरांना शुभेच्छा देवून समाजसेवेच्या या व्रतासाठी डॉक्टरांनी अधिक कार्यतत्पर होवून गोरगरीब जनतेपर्यंत सेवा पोचवावी, असे आवाहनही त्यांनी केले. जिल्हा परिषदेत आयोजित आरोग्य समितीच्या बैठकीत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे व अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.**

भल्या पहाटेपासून शेतकरी शेतात जातो, राबराब राबतो. त्याचे दुख;, त्याचे परिश्रम समजण्याची गरज आहे. शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांला प्रतिष्ठा आणि शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहीजे. कृषी दिन हा शासकीय कार्यालयात नव्हे; तर शेतक्ऱ्यांच्या बांधावर साजरा करण्यावर भर देत जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंजि. यशवंत गणवीर यांनी अधिकार कर्मचाऱ्यांसाठी 'एक दिवस शेतीसाठी' हा उपक्रम राबविण्याचे आवाहन केले.

आपला जिल्हा कृषीप्रधान आहे. जिल्हयात पाणीही मुबलक प्रमाणात आहे. वेगवेळे पीक घेवून आपणास प्रगती साधता येईल. केवळ उत्पादन घेवून शेतकऱ्यांनी थांबू नये, तर उत्पादनाचे मार्केटींग करण्यावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हा परिषद गोंदियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी केले.

वसंतराव नाईक यांच्या छायाचित्राला माल्यार्पण करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. दरम्यान धाबेटेकडी येथील प्रगतीशिल शेतकरी ललित सोनवाने, बोंडगाव/देवी येथील शेतकरी कुसन झोडे, मालकनपूर येथील शेतकरी नितीन पाटणकर यांचा याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषदेच्या कृषी विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## देवरीच्या तीन मग्रारोहयो कर्मचाऱ्यांवर कारवाई

### गोठा बांधकामात अफरातफर : तत्काळ प्रभावाने केले कामावरून कमी जिल्हाधिकारी यांनी दिले आदेश

**गोंदिया:–** देवरी पंचायत समिती अंतर्गत डवकी ग्राम पंचायतींतर्गत गोठ्यांचे बांधकाम झाले होते. त्या कामात सरपंच आणि सचिवाने अफरातफर केल्याचे प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालयात होते. प्रकरणाची सखोल चौकशी विभागामार्फत करण्यात आली. दरम्यान देवरी पंचायत समितीच्या मग्रारोहयो विभागात कार्यरत सहाय्यक कार्यक्रम अधिकारी गौतम साखरे, तांत्रिक अधिकारी मनोज बोपचे आणि डाटा एन्ट्री ऑपरेटर मुनेश्वर भूमेश टेंभरे दोषी आढळले. त्यामुळे त्यांना तत्काळ प्रभावाने कामावरून कमी करण्यात आले आहे.



सविस्तर असे की, देवरी तालुक्यातील डवकी येथे गायींच्या गोठ्याच्या निधीत सरपंच आणि सचिवाने अफरातफर केल्याची तक्रार झाली होती. त्या अर्जाची चौकशी केली. या प्रकरणात गट विकास अधिकारी यांनी दस्तऐवजांची तपासणी केली. त्यात सहाय्यक कार्यक्रम अधिकारी गौतम साखरे यांनी गुरांच्या गोठ्यांचे प्रस्ताव न तपासता कामाचे हजेरीपत्रक काढणे, लाभार्थिंना रक्कम अदा करण्यापूर्वी तपासणी केली नसल्याचे उघड झाले.

सध्याचे गोरेगाव पंचायत समितीचे सभापती तथा तत्कालीन देवरी पंचायत समितीच्या मग्रारोहयो विभागातील तांत्रिक अधिकारी (कृषी) मनोज बोपचे यांनी कामाला भेट न देता प्रत्यक्ष मोजमाप न करता मोजमाप पुस्तकात नोंद करणे, सुरुवातीच्या कामाची नंतर व नंतरच्या कामाची आधी नोंदी घेतल्याचे उघड झाले. तसेच क्लर्क कम डाटा एन्ट्री ऑपरेटर मुनेश्वर भूमेश टेंभरे यांनी साहित्याच्या देयकात मूळ क्रमांक व दिनांक स्वमजीने बदल करून कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका चौकशीत ठेवण्यात आला. तिन्ही कर्मचाऱ्यांनी गैरवर्तन केल्यामुळे त्यांची सेवा कंत्राटी पद्धतीची असतानाही शासकीय निधीचा अपहार करण्यात सहकार्य केल्याने तिघांवर देखील निलंबनाची कारवाई करण्यात आली. त्यांना तत्काळ प्रभावाने सेवेतून कमी करण्याचा आदेश आज, ३० जून रोजी जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी काढला.